समरसता

साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक ३, नोव्हेंबर २०२६

शंभराव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. शरणकुमार लिंबाळे



अभिनंदन!



चाफ्याची फुलं

निळ्या डोळ्यांचं आभाळ
भरून येईल याची सगळेच
वाट पाहत होते
खाली भुई भाजलेली...

लाही लाही होते म्हणून
विंचू, साप, किडे, मुंग्या
सगळेच सैरावैरा पळू लागतात
पृष्ठभागावर...

त्राहिमाम त्राहिमाम!
कोण म्हणत असेल?
एक खोल खोल हुंकार...
मुक्या जनावरांचे बाजार
भरगच्च!

जीव टांगून कुणी गेलेलं
प्रश्नांचं पान अर्धवट मिटलेलं...

रंगपटावरची माणसे
रोज नवे रंग लावून
नाटक करतायत
कुठे कुठे संकटांच्या महामालिका
तर कुठे भारत विरुद्ध इंडियाची
इन्किलाबी पताका
इथे मात्र,
दुष्काळ डोळ्यांचा माणूस

जुने नवे चष्मे लावून
हिशेबाच्या वहीतली
पाने वाचतोय...

झऱ्याचे गोड पाणी
बाटलीबंद करताना
व्यापारेषु कल्पना
तेजीत आहे...

गावाचे लोंढे
शहरांच्या ड्राणपुलाखाली
डोळे अंथरुन
गोळा झालेत

सिग्नलचा लाल डोळा उघडताच
ताई, गजरा घ्या ना!
गलका ऐकू येतो...
शाळकरी वयाच्या मुलांना
माझ्यातली शिक्षिका
त्यांचं गाव, त्यांची शाळा विचारते..
उत्तर येतं... दुष्काळ!
आणि माझे कान पोळतात...

सिग्नल बदलतात
वस्तू बदलतात
दुष्काळाचे बाजार बदलतात
सोनचाफ्याचा गंध बदलतो
गजऱ्यामध्ये दुष्काळाचा वास भरतो
इवले इवले हात माझ्या मागे मागे
फिरतात
मी तरी किती गजरे घेऊ?
दुष्काळापुरते कोणते निळे डोळे
लावू...?

– आशा पैठणे

वाटते असे मनात
चालता फुला फुलांत
वेचीत गंध जावे
निःशब्द गीत गावे!

निरव गंध पहाटेचा
पारिजातकांचा
वाकुनिया टिपावा
सदेह लीन व्हावे!

नक्षत्र पुंज धवली
हिरव्यात नवल भरते
प्राणात मोगरीच्या
मिसळून गंध प्यावे!

फुलले मदीर झुंबर
लटक चांदण्यांचे
त्या सांडल्या फुलांच्या
कशिद्यात धुंद व्हावे!

होताच ऊन्ह स्पर्श
बकुळ्यांस जाग येते
त्या गंध घोळक्यात
हृदय गुंगवावे!

नव्हे सोनचाफा
घमघमती फुले उन्हाची
सोन्यात गडद गंध
मन प्रकाशून जावे!

गोऱ्या पऱ्या सुगंधी
जाई जुई उमलती
वेड्या सायलीत सांज
बेभान गुणगुणावे!

रात्रीस बहर येता
ती उलाल रातराणी
लावीत कळ सुखाची
निशिगंध दरवळावे!

कांचन प्रकाश संगीत

समरसता
साहित्य पत्रिका

वर्ष ७, अंक ३, नोव्हेंबर २०२६

संपादक
रवींद्र गोळे
संपादक मंडळ
प्रा. डॉ. राजेंद्र नाईकवाडे
डॉ. रमा गर्गे
प्रा. गजानन होडे
प्रकाशक
समरसता साहित्य परिषद महाराष्ट्र

अंतरंग

महात्मा फुले आणि सामाजिक समरसता ४

शतकी साहित्य संमेलनाकडून मोठ्या अपेक्षा ९

ऊन होऊनी पसर जगावर... १२

भारतीय ज्ञानशलाका १५

रसग्रहणात्मक समीक्षा वाङ्मयीन विलसिते १८

सनातन वैदिक ग्रंथपरंपरेचा अर्थपूर्ण परिचय २१

भक्तीच्या माध्यमातून समतेचा संदेश देणारे संत रविदास २४

ज्ञानेश्वर : संत परंपरेच्या भावविश्वातील आद्यस्वर २६

कविता :
आशा पैठणे, कांचन प्रकाश संगीत

मुखपृष्ठावरचे चित्र
अंतरजालावरून साभार

मांडणी/अक्षरजुळणी आस्वाद प्रकाशन

संपर्क : संपादक समरसता साहित्य पत्रिका
१/६ जैन इस्टेट, विलेज रोड,
भांडूप (प.), मुंबई – ७८
इमेल : samarastaedit@gmail.com

खाजगी वितरणासाठी



जानेवारी महिन्यात होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यात विविध ठिकाणी 'नांदी संमेलने' होत आहेत. पैकी नागपूर येथे एक नांदी संमेलन संपन्न झाले. या संमेलनाचे उद्घाटक होते डॉ. अभय बंग.

आपल्या भाषणात बंग म्हणाले, गणेशोत्सव नको, गणोत्सव व्हावा. साहित्य संमेलनात एकूणच मूलगामी बदल व्हावा अशी अपेक्षा व्यक्त करायला काहीच हरकत नाही. पण या निमित्ताने काही प्रश्न आमच्यासमोर उभे राहिले आहेत. पहिला प्रश्न असा की, गण म्हणजे सकलजन असे न समजता आपल्या आवडीचे, आपल्या बैठकीतले हा शिरस्ता कुणी सुरू केला? मूठभरांच्या ताब्यात साहित्य संस्था अबाधित राहव्यात म्हणून राजकीय पाठबळ कुणी दिले?

वर्षानुवर्षे राजकीय क्षेत्रातील मानाचे गणपती उद्घाटक म्हणून कुणी आमंत्रित केले. त्याचे पाट आणि थाट हा साहित्य जगतापेक्षा राजकीय आकांक्षांनी झगमगीत असताना त्याकडे डोळे मिटून बघणारे कोण होते? सांस्कृतिक, साहित्यिक क्षेत्रात उघड जातीयवादी भूमिका घेणारे कुणाचे बगलबच्चे होते? असे अनेक प्रश्न या निमित्ताने समोर येत आहेत.

सुरुवातीपासूनच समरसता साहित्य परिषदेच्या माध्यमातून गणाचे साहित्य संमेलन आयोजित करत आहे. राजकीय मखरातील मातीचे गणपती नाचवण्यापेक्षा समाजाच्या व्यथा– वेदना मांडणारे साहित्यिक कार्यकर्ते सोबत घेऊन जनाचे साहित्यजगत उजळवण्याचा प्रयत्न करणाऱ्या समरसता प्रयोगाला विष संबोधणाऱ्यांना आता गणाची आठवण व्हायला लागली आहे. हेही नसे थोडके!

– रवींद्र गोळे



महात्मा फुले आणि सामाजिक समरसता

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्मच शिवशाही- पेशवाईच्या अस्तानंतर, दहा वर्षांनी झाला. या काळात पुण्यात अंदाधुंदीच होती. ब्रिटिशांच्या धूर्त नेतृत्वाने एका बलाढ्य साम्राज्याचा अस्त करून सत्ता हस्तगत केली होती. स्वार्थी लोकांचा इंग्रज अधिकाऱ्यांच्या भोवती गराडा होता. त्यांनी फार कमी वेळात पूर्ण राज्याचा ताबा घेतला होता. जे आपल्या बाजूला वळतील त्यांची सत्ता तशीच ठेवून त्यांचा उपयोग स्वतःचे आसन-प्रशासन बळकट करण्याकडे केला. याच काळात डेक्कन कॉलेज स्थापन झाले. आपल्याला अनुकूल असा ज्ञानीवर्ग निर्माण व्हावा. त्याचबरोबर समाजसुधारणा व्हावी.

पद्मश्री गिरीश प्रभुणे

९७६६३२५०८२

महाराष्ट्र भूमी ही सतत परिवर्तनाला साद देत आली आहे. गेली हजार-बाराशे वर्षे याची प्रचीती येत आहे. सामान्य कुळात जन्माला येऊन अत्यंत विरोधाला तोंड देत समाजातील विषमता दूर करण्याचे प्रयत्न झाले. यात सर्व स्तरांतील संत अग्रेसर राहिले. चक्रधर स्वामी, ज्ञानेश्वर माऊली, नामदेव महाराज, संत जनाबाई, संत तुकाराम महाराज, संत चोखोबाचे सर्व कुटुंब, संत एकनाथ, संत रामदास अशा संतांची मांदियाळी सर्व स्तरांतून निर्माण झाली. तरीही सामाजिक विषमता राहिली. याच्या कारणांचा शोध घेतला, तर सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे देश-राष्ट्र-समाज जेव्हा गुलामगिरीत असतो. पारतंत्र्यात असतो, त्या वेळी विषमता वाढीस लागते. सर्व प्रकारच्या स्वातंत्र्यासाठी- बंधुभावाचे वातावरण निर्मिण्यासाठी आचार-विचार-संचार स्वातंत्र्य निर्माण व्हावे लागते. समता निर्माण होण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज असते आणि समूहाने वाटचाल व्हायची असेल, तर कोणत्याही प्रकारची गुलामगिरी वा पारतंत्र्य असता उपयोगी नाही. पारतंत्र्याने स्वातंत्र्यावर बंधने येतात. विचार कुंठित होतात. विचारांवर बंधने आली, की संचारावर-आचारांवर-लेखनांवर बंधने येतात. या बंधनांनी विकास थांबतो. विकास थांबला, की सर्व प्रकारची प्रगती खुंटते आणि मग समाज सर्व प्रकारच्या

गुलामगिरीत अडकतो.

अशा गुलामगिरीला झुगारून देण्याची क्रांतिकारक कामगिरी महात्मा जोतीराव फुले यांनी केली. म. फुले यांच्या आधीचा काळ थोडा पाहूया. पुणे–महाराष्ट्र जवळजवळ भारतातला खूप मोठा भाग मुस्लिम आक्रमकांच्या तावडीतून, अंमलाखालून मुक्त होऊन छ. शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात आला होता. मराठी सरदार–वतनदार मध्य भारतात, गुजरात, उत्तर हिंदुस्थानात सर्व प्रकारच्या व्यवस्था पाहू लागले होते आणि केवळ शंभर–पन्नास वर्षांच्या आतच इस्लामच्या कचाट्यातून सुटून स्वराज्याची व्यवस्था लागण्यापूर्वीच ब्रिटिश आक्रमकांच्या हाती सर्व स्वराज्य गेले. त्याचा परिणाम सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय व्यवस्थेवर झाला. साम्राज्यवादी ब्रिटिश हे सर्वच बाबतीत आघाडीवर होते. इस्लामचा कालखंड अत्याचार, अन्याय, धार्मिक अंधकाराचा, विध्वंसाचा, लूटमारीचा–कपटनीतीचा होता. या काळात समाज भीतिग्रस्त होता. समाजात सुधारणा, शिक्षण यांचा अभाव होता. मुस्लिम राज्यकर्त्यांचे सरदार हे दहशतीने, अत्याचाराने राज्यकारभार हाकीत. अशा विस्कळीत समाजाची व्यवस्था लावायला पुरेसा कालावधी मिळाला नाही. आर्थिक स्थिरतेसाठी सामाजिक–सांस्कृतिक स्थिती निकोप असावी लागते. प्राचीन काळापासूनचा युरोप व जगाशी असलेला व्यापार, देवाण–घेवाण ही मुस्लिम राज्यकर्त्यांच्या मर्जीनेच चालायची. त्यात अनिश्चितता अधिक होती. त्यामुळे द्रारिद्र्य वाढत गेले. युरोपातील नव्या उद्योगवाढीशी, संशोधनाशी, औद्योगिक क्रांतीशी, बदलाशी भारतीयांचा संबंध आला नाही. त्यामुळे तंत्रज्ञानातील क्रांती भारतात ब्रिटिशांच्या आगमनानंतरच खूप काळाने आली. संपूर्ण भारतभर एकसंध अशी रचना–पद्धती अस्तित्वात नव्हती. असुरक्षितता अधिक होती. गावपातळीवर– पंचक्रोशीवर आधारित व्यवसाय सीमित होते. इंग्रजांनी सर्वच क्षेत्रांत विशेषतः व्यापार, कृषी, संरक्षण आणि शिक्षण, दळणवळण याच्यात क्रांती केली. न्यायव्यवस्था, प्रशासन, जिल्हा व तालुका पातळीवर समान आणले.



याचा परिणाम म्हणून भारतीय सर्वच बाबतीत मागासलेले गणले. सामाजिक स्थितीत कुणाचेच नियंत्रण नव्हते. यात सर्वंकष बदलाची आवश्यकता होती. कुठल्याच क्षेत्रात समान व्यवहार नव्हता. विशेषतः उच्च वर्णीय आणि इतर समाज यांच्यातील व्यवहार पराकोटीचा विषम होता. सामाजिक विषमतेने उच्चांक गाठला होता.

अशा काळात प्रशासनातील अधिकारी, त्यांचे शिक्षण, त्यांची धार्मिकव्यवस्था, न्यायव्यवस्था, परीक्षा पद्धती, चर्चच्या व्यवहारातील सर्वसमावेशकता, त्यांचे धार्मिक व्यवहार, या सर्वांचा प्रभाव भारतातील तत्कालीन भारतीय विचारवंतांवर, नेतृत्वावर पडला. त्यातून देशभर सामाजिक परिवर्तनाच्या चळवळी उभ्या राहिल्या.

महात्मा जोतीराव फुले यांचा जन्मच शिवशाही–पेशवाईच्या अस्तानंतर, दहा वर्षांनी झाला. या काळात पुण्यात अंदाधुंदीच होती. ब्रिटिशांच्या धूर्त नेतृत्वाने एका बलाढ्य साम्राज्याचा अस्त करून सत्ता हस्तगत केली होती. स्वार्थी लोकांचा इंग्रज अधिकाऱ्यांच्या भोवती गराडा होता. त्यांनी फार कमी वेळात पूर्ण राज्याचा ताबा घेतला होता. जे आपल्या बाजूला वळतील त्यांची सत्ता

तशीच ठेवून त्यांचा उपयोग स्वतःचे आसन-प्रशासन बळकट करण्याकडे केला. याच काळात डेक्कन कॉलेज स्थापन झाले. आपल्याला अनुकूल असा ज्ञानीवर्ग निर्माण व्हावा. त्याचबरोबर समाजसुधारणा व्हावी. इंग्रजी भाषा-तत्त्वज्ञान-वाङ्मय यांचा अभ्यास, इतिहास, हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म यांचा अभ्यास यांचे एक नवे दालन सुरू झाले. केवळ इंग्रजांना पाठिंबा देणाराच वर्ग तयार न होता, चालीरीती, चांगले-वाईट हे समजणारा समाज हळूहळू निर्माण होऊ लागला. हिंदू धर्माच्या-समाजाच्या अनिष्ट चालीरीती यांचा अभ्यास होऊ लागला. आपली परंपरा त्यातले बरे-वाईट यांची तुलना करणारे स्थानिक नेतृत्व पुढे येऊ लागले. इंग्रजी सत्तेचे फायदे-तोटे, गुलामगिरी यांचा अभ्यास होऊ लागला.

इंग्रजांना घालवायचे तर इथे परत सत्ताधीश कोण होणार? याची पण समाजात चर्चा सुरू झाली. उच्च ब्राह्मण वर्ग त्यांच्यातील अनेक चालीरीती, अंधश्रद्धा, विषमता, भेदाभेद, भेदांचे समर्थन करणारे धार्मिक नेतृत्व, त्यामुळे कुणालाच आपला समाज एकसंध व्हावा, विषमता, भेदाभेद, अमंगळ चालीरीती दूर व्हाव्यात असे वाटत नव्हते. त्यामुळे आपोआपच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी त्यांचे धार्मिक शिक्षण, सर्वसमावेशक चर्च, प्रार्थना, अत्यंत साधेपणा, सर्वांत सहज मिसळून जाण्याची वृत्ती, यांचा प्रभाव समाजातील जाणकार वर्गावर झाला. सत्तेसाठी लष्करी बळाचा वापर आद्य क्रांतिकारक राजे उमाजी नाईक यांच्यासारख्यांचे उठाव अत्यंत क्रूरपणे मोडून काढून सत्ता स्थिर करणारे ब्रिटिश नेतृत्व, यामुळे फार थोड्या काळात संपूर्ण देशात विरोध करणाऱ्यांना फासावर लटकवून, देशद्रोही, राजद्रोही ठरवून, तुरुंगात डांबून ब्रिटिशांनी आपली सत्ता स्थिर केली.

या काळात महात्मा फुले लहानाचे मोठे झाले. समाजातील स्वार्थीवृत्ती अनिष्ट चालीरीती कर्मकांडालाच धर्म मानणारा मोठा वर्ग, गरीब, दलितांची अत्यंत दयनीय अवस्था त्यांनी पुण्यासारख्या देशाची राजधानी असलेल्या ठिकाणी पाहिली. समानता-समतेचा अभाव, शिक्षणाची कोणतीच व्यवस्था नाही. समाजातील उच्चवर्ग ब्राह्मण, त्यांच्यातील अनिष्ठ प्रथा, ब्राह्मण स्त्रियांची हीन-दीन अवस्था, विधवांची



होणारी विटंबना हे उघड्या डोळ्यांनी पाहणे त्यांना शक्यच नव्हते. एकीकडे दलित मागास–महार–मांग–चर्मकार असा वर्ग फक्त कष्ट करणारा, त्याच्या बदल्यात मानहानी– अवहेलना–हेटाळणीचाच अधिकार! पोटभर अन्न, अंगभर कपडा आणि निवारासुद्धा नसणारा हा वर्ग हीन–दीन होऊन अत्याचार सहन करी. त्याला पाणीसुद्धा प्यायला मिळत नसे. एवढेच काय दलितांबरोबर सामान्य व्यवहारसुद्धा अत्यंत हीनपणे केले जात. त्यांच्याशी होणारे सर्वच व्यवहार हे समानतेला, मानवतेला, धर्माला काळिमा फासणारे होते. अशा वातावरणात देशाच्या पारतंत्र्याचे मूळ समाजाच्या, हिंदू समाजाच्या या विषमतेच्या व्यवहारात आहे. बहुजन समाज हा मोठा वर्ग दुबळा–दुर्बल... गतजन्मीच्या पापांचे देणे ह्या जन्मी आयुष्यभर फेडत राहणे, असे मानणारा होता. समाजात समाज म्हणून जगण्यासाठी लागणारी सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक जडणघडण करणारी क्रियाच अस्तित्वात नव्हती. अशा काळात महात्मा फुले यांनी केवळ भाषणे नाही दिली. स्वत:पासून त्यांनी सुरुवात केली. स्वत:च्यात बदल केले. स्वतः संघर्ष केला. स्वत:ची पाण्याची विहीर महार–मांग या दलित वर्गाला मोकळी केली. केवढे मोठे क्रांतिकारक पाऊल होते, याची आज कल्पना नाही येणार. सावलीला विटाळ मानण्याच्या काळात हे धाडसी पाऊल टाकणारे महात्मा फुले होते. समाज शिक्षित व्हायचा असेल तर स्त्रियांनी शिकले पाहिजे. त्यासाठी स्वतःच्या पत्नीला, सावित्रीबाईंना शिकवून तयार केले. स्त्रियांसाठी शाळा चालवणे, हे किती कठीण होते? सर्व समाज, स्वजातीयांपासून सर्वच विरोधात गेलेले, वडीलही विरोधात गेले, तरीही न डगमगता जोतीबा–सावित्रीबाईंनी आपले कार्य अत्यंत धाडसाने सुरू ठेवले. ज्या काळात संपूर्ण देशात भारतात इंग्रजी राजवटीविरोधात वातावरण तयार होत असताना, अठराशे सत्तावनच्या काळात ऐन तारुण्यात जोतीबांनी अविचलपणे सामाजिक स्वातंत्र्याला प्राधान्य दिले. इंग्रजी शिक्षण, राजवट, अन्याय करणारे इंग्रजांचे कायदे, इंग्रजांचा जुलमी व्यवहार या सर्वांना विरोध करून देशभरात लढे सुरू असताना, ही परकीयांची मुजोरशाही ज्या कारणांमुळे आली, ज्या कारणांमुळे एवढा महान भारत देश पारतंत्र्यात गेला, ती सामाजिक विषमता समूळ उखडून फेकायला हवी. ही सामाजिक विषमतेची विषवल्ली उखडून फेकण्यासाठी सर्वांनी खांद्याला खांदा लावून त्याविरुद्ध उभे राहायला हवे. समाज रूढीबंधनातून पूर्ण मुक्त झाला तरच तो बलशाली होईल, या बंडखोर विचारांना म. फुले दांपत्याने स्वत:च्या कृतीची जोड देऊन सामाजिक समरसतेचा एक मानदंड समाजाच्या समोर ठेवला.

नुसती वाचिक समता काय कामाची? त्याला कृतीची जोड हवी. ही कृती दुसऱ्याने करावी असे वाटत असेल, तर त्याची सुरुवात स्वत:पासून करायला हवी. समाजाच्या विरोधात उभे राहून कृती करणे आणि तेही त्या काळात हे अवघड कार्य म. फुले यांनी केले. त्यांच्या जीवनातील सामाजिक रूढींच्या विरोधातल्या चळवळी पाहिल्या, तर खंबीरपणे एकाकीपणे प्रचंड ताकतवान समाजाला विरोध करून, आपल्या बाजूने उभे करणे हे सामान्य कार्य नाही. हातात पैसा नाही, बरोबर समाज नाही अशा काळात मुळा–मुठा नदीच्या काठावर गस्ती पथक तयार करून रात्रभर पहारा देणे. बापरे केवढे धैर्य! कशासाठी? ब्राह्मण तरुण विधवा मुलींवर होणाऱ्या अत्याचारांमुळे त्यांना दिवस जात. त्या आत्महत्येस प्रवृत्त होत. याची आकडेवारी ब्राह्मण समाजातील असामाजिक स्थितीची जाणीव करून देणारी आहे, त्यामुळे अस्वस्थ होऊन सावित्रीबाई आणि जोतीबांनी एक संरक्षक दल उभे केले. ब्राह्मणांचा रोष–विरोध पत्करून स्वतःच्या घरात त्यांनी एक आश्रम सुरू केला. दीडशे वर्षांपूर्वी! विधवांनी आपला जीव न गमावता या आश्रमात येऊन बाळंतपण करावे आणि त्यांनी आपल्या मुलांना वाढवावे. अशा आशयाचा फलक लावून हे कार्य ते करत होते. पुण्यासारख्या ठिकाणी अशा प्रकारे कार्य करण्यासाठी केवढे मोठे बळ हवे! आणि यासाठी काम करताना त्यांच्यावर प्राणघातक हल्ले झाले. त्यांच्या विचारांवर प्रखर टीका झाली. तरीही न डगमगता धीर न सोडता त्यांनी हिंदू समाज–धर्म सुधारणा सुरूच ठेवल्या.

सर्वत्र राष्ट्रीय स्वातंत्र्य, स्वातंत्र्य लढा, क्रांतिकारकांचे उठाव होत असताना, उद्याचा स्वतंत्र भारत, उद्याचे

स्वातंत्र्य आपल्याला कसे हवे, याचा विचार करून प्रसंगी अत्यंत कठोर होऊन त्यांनी सामाजिक विषमतेविरुद्धचा लढा सुरूच ठेवला.

तो काळ असा होता, अनेक ब्राह्मण नेते– वेदशास्त्रसंपन्न घराणी मिशनऱ्यांच्या कळपात सामील झाली. वाईचे गोऱ्हे शास्त्री, नगरचे (अहिल्यादेवी नगर) मोडक–कोल्हटकर, रेव्हरंड टिळक असे असंख्य जण ख्रिश्चन झाले; परंतु महात्मा फुले आणि सावित्रीबाईंनी त्या वातावरणातही विरोध पत्करूनही धर्मत्याग न करता, धर्मसुधारणा सुरू ठेवल्या.

स्त्री शिक्षणाबरोबरच धार्मिक रीतीरिवाज बदलण्यासाठी सर्व समाजाला उपयुक्त ठरतील, असे धार्मिक विधी तयार केले. ब्राह्मण पुरोहितांना पर्यायी बहुजन सत्यशोधक पुरोहित निर्माण केले. ब्राह्मण स्त्रिया विधवा झाल्यावर त्यांचे केस कापायला जाणाऱ्या नाभिक समाजाला समजावून नाभिकांचा केशवपनावर बहिष्कार करविला. अशाच एका ब्राह्मण विधवेच्या मुलाला दत्तक घेऊन एक वेगळा सामाजिक समरसतेचा आदर्श त्यांनी समोर ठेवला.

आज महात्मा फुलेंच्या जन्माला दोनशे वर्षे होत आहेत. अशा काळात हिंदू समाज खरोखरच सामाजिक समरसता वर्तनात आणताना दिसतो का? याचा गंभीरपणे विचार करायला हवा. त्या काळात म. फुले आणि सावित्रीबाईंना जो तीव्र विरोध सहन करावा लागला, तरीही त्यांनी अत्यंत संयमाने आपले कार्य सुरूच ठेवले. आजही समाजातील खूप मोठा वर्ग या विषमतेचा बळी ठरत आहे. आता साधने बदलली आहेत. सामाजिक लढा अधिक तीव्र झाला आहे. जग जवळ येत चालले आहे. अशा काळात सामाजिक विषमतेची पाळेमुळे पूर्णतः मनातून दूर करायची असतील, तर म. फुले यांच्याप्रमाणे समाजातील तळगाळातल्या घटकांशी समरस व्हायला हवे. आज खूप मोठ्या प्रमाणात शिक्षणाचा प्रचार झाला आहे असे वाटते; परंतु गरीब दलितांना शिक्षण खूप महाग झाले आहे. पारधी, कंजारभाट, वडार, धनगर असा खूप मोठा समाज आजही शिक्षणापासून वंचित आहे.

कोल्हाटी, डोंबारी असे समाजघटक शिक्षणामुळे सन्मानाने जगू लागल्याची उदाहरणे आहेत. अशा वेळी कला केंद्र, तमाशा बंद पडत असताना पारधी मुलांना या केंद्रात भरती होऊन केवळ पोटासाठी जगावे लागते आहे. अशा मन विषण्ण करणाऱ्या या घटना वेगाने सुधारणा–विकास होण्याऱ्या काळात घडत आहेत; पण लक्षात कोण घेतो! त्यामुळे आजही महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रेरणांची आणि चरित्रांची, कार्यांची सतत गरज आहे. विषमताविरहित समाज निर्माण करण्यासाठी प्रत्यक्ष समरसतेच्या व्यवहाराची गरज आहे आणि याचे खरेखुरे आदर्श हे म. फुले, सावित्रीबाई फुले यांचे जीवनचरित्र अभ्यासून त्याप्रमाणे समरसतेचा व्यवहार आपल्याकडून घडावा, ही अपेक्षा.

(मसापमधून साभार)





शतकी साहित्य संमेलनाकडून मोठ्या अपेक्षा

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्य मुद्दा असतो व्यवस्थांचा आणि नियोजनाचा! परिसंवादांची संख्या वाढवून एकाच वेळी विविध ठिकाणी विविध मंडपात छोट्या छोट्या स्वरूपात विविध विषयांवरील परिसंवाद व्हावेत! त्याचप्रमाणे छोटे छोटे लेखक-मंच असावेत, ज्यात जुन्या व नव्या पिढीतील लेखकांचा प्रेक्षकांशी, साहित्यारसिकांशी संवाद-परिचय होऊ शकतो. अशा मंचांवर एक एक तासांच्या छोट्या मुलाखती होऊ शकतात.

डॉ. राजेंद्र नाईकवाडे

७

शंभरावे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन पुणे विद्यापीठाच्या परिसरात पुढील काळात होऊ घातले आहे. ते सर्वार्थाने भव्यदिव्य आणि समावेशक व्हावे, वाङ्मयीन अंगाने दर्जेदार आणि उच्च स्तराचे व्हावे, अशीच अपेक्षा आमच्यासारख्या अनेक साहित्य रसिकांची असणार हे उघडच आहे. परंतु त्यासाठी काहीतरी जाणीवपूर्वक व ठोस निर्णय आयोजकांना घ्यावे लागतील असे वाटते! आजवर मान्य झालेले वशिलेबाजी आणि राजकीय प्रभाव हे दोन मापदंड जरा बाजूला ठेवून संमेलनातील सहभागी साहित्यिकांची निवड करावी लागेल, ती शुद्ध वाङ्मयीन महत्तेच्या आधारावर! उदाहरणार्थ, कविसंमेलनातील कवी आणि परिसंवादातील वक्ते यांची निवड वशिला, ओळखी, राजकीय कार्यकर्ते घुसखोरी, या मापदंडांपेक्षा गुणवत्तेच्या आधाराने व्हायला हवी! नाहीतर कुणीही या महत्त्वपूर्ण व्यासपीठावर घुसखोरी करून अनावश्यक, साहित्यबाह्य, राजकीय प्रचारकी शेरेबाजी करीत सुटतात! सोबतच कुठल्याही प्रकारची, कुणाही आंदोलनजीवी प्राण्यांसाठी लांगुलचालनवादी भूमिका न घेता खऱ्या अर्थाने विशुद्ध वाङ्मयीन अशा मुक्त आणि भयमुक्त वातावरणात हे संमेलन व्हायला हवे! प्रत्येक संमेलनात कुठले तरी विघ्नसंतोषी कीटक आणि झुरळे संमेलनात घुसून अपशकून करण्याचा प्रयत्न



करीत असतात! अशांचा अजिबात संसर्ग संमेलनात होऊ नये यासाठी आयोजकांनी पक्के आणि ठाम पूर्वनियोजन करायला हवे! एकदा घेतलेल्या भूमिकांवर अखेरपर्यंत ठाम राहायला हवे!

संमेलनाच्या यशस्वीतेसाठी मुख्य मुद्दा असतो व्यवस्थांचा आणि नियोजनाचा! परिसंवादांची संख्या वाढवून एकाच वेळी विविध ठिकाणी विविध मंडपात छोट्या छोट्या स्वरूपात विविध विषयांवरील परिसंवाद व्हावेत! त्याचप्रमाणे छोटे छोटे लेखक-मंच असावेत, ज्यात जुन्या व नव्या पिढीतील लेखकांचा प्रेक्षकांशी, साहित्यारसिकांशी संवाद-परिचय होऊ शकतो. अशा मंचांवर एक एक तासांच्या छोट्या मुलाखती होऊ शकतात. (ज्याप्रमाणे अलीकडे राष्ट्रीय पुस्तक न्यासच्या पुस्तक महोत्सवात होत आहेत.) ग्रंथ प्रकाशनासाठीही चार-पाच स्वतंत्र व्यासपीठे असावी आणि त्यावर हौशी व प्रस्थापित साऱ्यांनाच आपापले ग्रंथ प्रकाशित करता यावे. त्याचप्रमाणे नवसाहित्य, स्त्रीकेंद्रित साहित्य, बालसाहित्य, युवासाहित्य अशी स्वतंत्र दालने करता येऊ शकतात. मात्र जात-पात, वर्गविशेष, प्रदेशविशेष अशी दालने टाळायला हवीत.

परिसंवादांचे संभाव्य विषय

विषयांमध्ये अर्थातच पुराणमित्येव न साधु सर्वं... या न्यायाने नव्या आणि जुन्याचा समन्वय हवा! शक्यतोवर भाषा आणि साहित्य या क्षेत्राचे वास्तव, त्यातील प्रश्न-समस्या आणि त्यापुढील आव्हाने, यासोबतच उज्ज्वल भविष्याचाही सकारात्मक अंगाने विचार करणारे विषय चर्चेत घ्यायला हवेत. ओढूनताणून राजकीय वा प्रचारकी, जातीय वा धार्मिक टीकाटिप्पणीला वाव देणारे, भेदाभेद उत्पन्न करणारे विषय टाळायला हवेत. प्रादेशिक अस्मिता, जातीय अस्मिता जागविणारे विषय नकोत! वाङ्मयीन आणि वैचारिक अशा मूलगामी बीजविषयांवर, समकालीन चर्चाविषयांवर, सद्यकालीन भाषिक वाङ्मयीन समस्यांवर, भविष्यातील स्थितीगतीवर चिंतन व्हावे. उदा. मराठी समीक्षा कुठे आहे सध्या? मराठी कादंबरीत सध्या काय सुरू आहे? इत्यादि. यामध्ये बृहन्महाराष्ट्रातील व महाराष्ट्राच्या सर्व भागातील साहित्यिक-रसिकांना योग्य प्रतिनिधित्व मिळाले पाहिजे. अन्य परिसंवाद-विषयांमध्ये समाजमाध्यमांवरील साहित्याची गुणवत्ता, झालेले सार्वत्रिकीकरण आणि सुमारीकरण, मराठी काव्यप्रवाहाचा मुख्य प्रवाह कोणता? सामाजिकता आणि सांस्कृतिकता काव्यातून कशी प्रवाहित होते, वैश्विक साहित्यात आपले स्थान काय? मराठी बोलीभाषांचे अस्तित्व आणि त्यांचे वाङ्मयीन योगदान, साहित्याचे सार्वकालिक व समकालीन मापदंड असतात का? भाषांतर आणि अनुवादाचे क्षेत्र, अभिजात मराठी साहित्य म्हणजे नेमके काय? अन्य भारतीय भाषांतील साहित्य व मराठी साहित्य यांचा अनुबंध, सबंदी संबंध आहे का? मराठी माध्यमाच्या शाळांची सद्यस्थिती, हिंदी व मराठी साहित्याच्या सेतू गेला कुठे? हिंदी व मराठी : संघर्ष की समन्वय? वाङ्मयीन संस्थांच्या वाङ्मयीन कार्याची (की राजकीय कार्याची?) सद्यस्थिती, मराठी-इंग्लिश : संघर्ष की हातमिळवणी? इत्यादी चिंतेचे विषय इथे चिंतनाचे विषय व्हावेत.

साठोत्तर व नव्वदोत्तर काळातील दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, महानगरी इत्यादी साहित्यप्रवाहांप्रमाणेच वन साहित्यप्रवाह, विज्ञान साहित्यप्रवाह, बाल साहित्यप्रवाह, समरसता-

साहित्यप्रवाह, राष्ट्रीय साहित्यप्रवाह, भारतीय स्त्रीकेंद्री साहित्यप्रवाह, नवमाध्यमकेंद्री साहित्यप्रवाह, राजकीय साहित्यप्रवाह, आध्यात्मिक–धार्मिक साहित्यप्रवाह, सांप्रदायिक (विविध संप्रदायनिष्ठ) साहित्यप्रवाह, डिजिटल (ई–बुक्स इ.) साहित्यप्रवाह, सामाजिक सेवाप्रकल्पकेंद्री साहित्यप्रवाह, नवलोक साहित्यप्रवाह, मराठी अनुवादित साहित्यप्रवाह, तृतीयपंथी साहित्यप्रवाह इत्यादी विविध वाङ्मयीन प्रवाहांची ओळख, अभ्यासपूर्ण मांडणी आणि प्रस्थापना या शताब्दी संमेलनाच्या निमित्ताने व्हायला हवी.

अध्यक्षीय भाषणावर दुसऱ्या वा तिसऱ्या दिवशी एक परिसंवाद (पूर्वीसारखा) होऊ शकतो. फक्त टीकाटिप्पणी औचित्याला धरून असावी आणि तसेच जबाबदार वक्ते त्या परिसंवादात असावेत. शतकी संमेलनाचा उत्तम, विविधांगी व समावेशक विशेषांक वा विशेष ग्रंथ निघायला हवा. अलीकडे ग्रंथरूपात काढण्याची पद्धत आहे! (उदा. पिंपरी चिंचवड संमेलनग्रंथ!)

एकंदरीत शंभरावे संमेलन हे मराठी भाषा–साहित्य–संस्कृतीच्या शंभर वर्षांच्या समृद्ध परंपरेला अधिक समृद्ध करणारे आणि सोबतच मराठी भाषा साहित्य आणि संस्कृतीच्या संरक्षण–संवर्धनाच्या नव्या वाटा उजळणारे होवो या सदिच्छांसह थांबतो!

सदस्य
समरसता साहित्य परिषद, महाराष्ट्र





ऊन होऊनी पसर जगावर...

असं म्हणतात की, चंद्राच्या कलेप्रमाणे आपली मनोवस्था बदलत असते. पण दिवसभरात सूर्याच्या स्थानाप्रमाणे सुद्धा आपली भावनिक स्थित्यंतरं होत असतात. सकाळचा उत्साह, दुपारचा जोम संध्याकाळी कमी होतो. संध्याकाळी घरी परतण्याचे वेध लागतात. मन कातर होतं. उन्हाप्रमाणे मन अलवार होतं. प्रेयसीला प्रियकराची ओढ लागते.

अश्विनी जांभेकर-पितळे

९९२२९५२२५८

हिवाळ्यात दुपारी चार-पाच वाजता बागेत फिरायला गेलं की, सरत्या उन्हाचा स्पर्श अंगाला सुखावून जातो. झाडांच्या महिरपातून जाताना, अर्ध्या कोमेजलेल्या फुलांचा सडा पडलेला असतो. उन्हाच्या एखाद्या मोठ्या पिवळ्या ठिपक्यात दोन-तीन मांजरी पेंगुळलेल्या असतात. एखादी खार उगाचच लगबगीने जमिनीवरून काहीतरी उचलून पुन्हा झाडावर जाते. पानांच्या झिरमिळ्यांमधून जमिनीवर क्षणाक्षणाला बदलणारी उन्हाची रांगोळी उमटलेली असते. मला पडगावकरांची एक कविता आठवते,

पिकलेले रंग सगळ्या झाडांवर
पापणीचा अलगदपणा आज उन्हात
साईसारख्या मऊ मऊ धुळीतून
एक खार हळूच गेली पळून रानात...

एखादी व्यक्ती किंवा एखादी गोष्ट मुबलक आणि सहज उपलब्ध असली की तिला फार गृहीत धरलं जातं. तसंच काहीसं उन्हाच्या बाबतीत झालंय. पावसाची जेवढी प्रतीक्षा, जेवढं स्वागत आपण करतो तेवढे उन्हाचे लाड होत नाहीत. जितक्या कविता पावसावर होतात, तितक्या उन्हावर होत नाहीत. पण तरीही ऊन महत्त्वाचं. कारण ऊन आहे म्हणून पाऊस आहे आणि ऊन आहे म्हणून रंग आहेत.

इंग्रजीमध्ये उन्हासाठी वेगळा असा शब्दच नाही. हे

भौगोलिक आणि भाषिक दोन्ही प्रकारचं दारिद्र्य आहे. ऊन म्हणजे sunlight किंवा sunshine नाही. ऊन म्हणजे 'प्रकाशाचा स्पर्श'! आणि प्रकाशालाही किती रूपं असावीत! दिवसाच्या प्रत्येक प्रहरात ऊन बदलत जातं.

पहाटेच्या वेळी पूर्व दिशा तांबूस रंगाची असते. तान्ह्या बाळाची कुरळी मऊसूत जावळं वाऱ्यावर उडावी तसं क्षितिज दिसत असतं. हळूहळू बाळ अंगणात रांगत रांगत अंगावर यावं तसं ऊन रांगत येतं. बाळाचा स्पर्श जसा सुखावणारा असतो तसाच ह्या उन्हाचा स्पर्शदेखील सुखवतो. उन्हाचं हे गोजिरवाणं रूप भा. रा. तांबे यांच्या कवितेत फार सुंदर उतरलंय,

पिवळे तांबूस ऊन कोवळे पसरे चौफेर
ओढा नेई सोने वाटे वाहुनिया दूर...

हळूहळू ऊन तारुण्यात येतं. तारुण्यातले सगळे आवेग जसे टोकाचे असतात तसं दुपारच्या उन्हाचं तेज, दीप्ती, दाह, प्रखरता सारंच टोकाचं. बोचरं तरीही चैतन्यमय. बा. भ. बोरकर या उन्हाचं वर्णन करताना म्हणतात,

उन्हात जरतारी जलधारा
स्फटिक महाली लक्ष दिवे
स्वर्गधरेच्या शुभमंगली या
गळ्यात माझ्या गीत नवे

ह्याच दुपारच्या उन्हाचं वर्णन कवी ग्रेस यांनी त्यांच्या शैलीत वेगळंच केलंय. ते म्हणतात,

दुपारचे सचित्र ऊन मृगजळास लांबवी
अनंत इंद्रियातले स्वतंत्र शोक जागवी...

दुपारचं ऊन कवीला फसवं भासतं, कारण ते मृगजळ दाखवतं. आणि मनाला सहावं ज्ञानेंद्रिय म्हणतात. या मनाला अनंत इंद्रियं असावीत असं ते वागतं. जे जे इंद्रियजन्य ते ते दुःखकारक! त्यामुळे काव्यातल्या दुःखाच्या सुराला पोषक असं हे ऊन आहे.

संध्याकाळच्या आधी प्रौढत्वाकडे झुकलेलं ऊन जरा सौम्य आणि विचारी होतं. दाराच्या फटीमधून उन्हाची तिरिप किंवा खिडकीमधून उन्हाचे कवडसे आत येतात. त्या कवडशांमध्ये हवेतली धूळ चमकायला लागते. उन्हाचं हे लोभस रूप अंतर्मुख करणारं वाटतं. आजूबाजूच्या गोष्टी अधिक डोळसपणे बघायला हे ऊन सांगतं.

दिवस मावळतीला झुकतो तसा उन्हाचा रंगही बदलतो. पश्चिमेला रंगांचा सोहळा असतो. अस्ताची जाणीव झाल्यावर सूर्य जणू जगण्याचा महोत्सव साजरा करत असतो. पुन्हा बोरकरांच्या शब्दात सांगायचं झालं तर,

जाता जाता उन्हे जिण्याची आता मावळताना
आठवणींच्या पाषाणांना फुटे फुलांचा पान्हा...

वृद्धत्वाकडे झुकलेली माणसं जास्त हळवी होतात. गतकाळात रामतात. त्या आठवणी रंगीबेरंगी आणि फुलांप्रमाणे सुगंधी असतात. जाताना कुठेही विषाद नसतो, उलट तृप्ती असते.

असं म्हणतात की, चंद्राच्या कलेप्रमाणे आपली मनोवस्था बदलत असते. पण दिवसभरात सूर्याच्या स्थानाप्रमाणे सुद्धा आपली भावनिक स्थित्यंतरं होत असतात. सकाळचा उत्साह, दुपारचा जोम संध्याकाळी कमी होतो. संध्याकाळी घरी परतण्याचे वेध लागतात. मन कातर होतं. उन्हाप्रमाणे मन अलवार होतं. प्रेयसीला प्रियकराची ओढ लागते. पडगावकर लिहितात,

सांजवेळा सोनहळवे ऊन आहे
गोडवारा बासरीची धून आहे
आतुरे पाणी नदीचे रंगबाधा
पाहताहे सावळ्याची वाट राधा

ऋतुमासाप्रमाणेसुद्धा उन्हाचा स्वभाव वेगळा असतो. बोरकरांच्या जेवढ्या कविता पावसावर आहेत, तेवढ्याच उन्हावारसुद्धा! त्यांच्या रंगासक्तीमुळे त्यांच्या कवितांची मोहिनी वेड लावते. त्यांच्या कवितेत ऊन 'हळद लावून' येतं, कधी ते कानकाचं दिसतं तर कधी सोनवर्खी. पौष महिन्यात ऊन कसं, तर–

पौषातील ऊन गडे
रजताच्या झारितून
झाडांवर सोनकडे

वसंताचं ऊन तर त्याहून वेगळं. त्यात नव्याची चाहूल असते. पानगळीनंतरच्या झाडांवर उमलणाऱ्या नव्या लालसर पालवीवर पडणारं ऊन पाहताना प्रकाशालाही कोंब फुटतात की काय असं वाटतं.

निळा निळा दिस सोन्याच्या उन्हाचा,

गवताचा वास साता योजनांचा,
लवलवे पानी पारजाचे पाणी,
पाखरांचा हर्ष उसळे थव्यांनी

हेच ऊन वर्षाऋतूमध्ये एखाद्या हरवलेल्या मित्रासारखं वाटतं. कित्येक दिवस ढगांच्या आड राहिल्यावर अचानक एखाद्या दुपारी ते बाहेर येतं. ओल्या मातीवर पडतं, पानांवर साठलेल्या थेंबांत चमकतं आणि सगळं जग क्षणभर वेगळ्याच उजेडात न्हाऊन निघतं. पावसानंतरचं ऊन म्हणजे जणू युवतीने नुकताच चेहरा धुऊन आरशासमोर उभं राहावं तसं.

बकुळतळी गंधखुणा, ओले सुखस्वप्न उन्हा,
रोमांचित धरणीतल, पवनाला पोरपणा
श्रावणातलं ऊन कसं तर,
गिरीदरीतूनि झरे – नव्हे हे हिरे उसळती निळे
ढगाढगातुनि अन् पाऱ्यापरि ऊन गळे कोवळे

शरदाचं ऊन स्वच्छ, पारदर्शक. आकाश धुऊन निघाल्यासारखं आणि त्या नितळ आकाशातून पृथ्वीवर उतरणारं ऊनही तितकंच निर्मळ.

या उन्हाची भुरळ बोरकरांसह इतर कवींनाही पडली आहे. वा. रा. कांत लिहितात,

ऊन रेशमी पडता
डोळे फुलाचे दिपले
बिंब दवाच्या दर्पणी
साता जन्माचे पाहिले



कधीतरी संध्याकाळी एक विशिष्ट पिवळा प्रकाश पडतो, तिला आपण ’सांज खुलणे’ असं म्हणतो. त्या प्रकाशात हिरवा रंग आणखी वेगळा दिसतो. त्याचं वर्णन बालकवी करतात,

सांज खुले सोन्याहुनि पिवळे हे पडले ऊन
चोहीकडे लसलशित बहरल्या हिरवळी छान

ना. धों. महानोर, नायिकेच्या विरह भावना ‘श्रावणाचं ऊन मला झेपेना’ ही बैठकीची लावणी लिहून व्यक्त करतात.

पु. शि. रेगे, उलटलेल्या दुपारच्या उन्हाला एका खास व्यक्तीचं नाव देतात.

ज्योतिषशास्त्रात सूर्याला आत्म्याचा कारक मानतात. ज्याप्रमाणे सूर्यप्रकाशामुळे आपल्याला आजूबाजूच्या वस्तू स्पष्ट दिसतात, त्याप्रमाणे आत्मतत्त्वाची जाणीव झाली की माया स्पष्ट दिसू लागते. आत्मतत्त्व एकच असलं तरी त्याचे आविष्कार (शरीर) मात्र वेगवेगळे असतात, तसंच प्रकाश हे एकच तत्त्व आहे, पण उन्हाचे प्रकार मात्र अगणित!

उन्हाने पावसाच्या थेंबांना स्पर्श केला की आकाशाच्या ओठांवर इंद्रधनुष्य उमलतं. हे उन्हाचं सर्वात सुंदर काव्य आहे.



भारतीय ज्ञानशलाका

सखोल संशोधन, अभ्यासपूर्ण व संतुलित लेखन, वैचारिक स्पष्टता, विवेचनात्मक व सोप्या भाषेत मांडणी आणि अनेक वाचकांना निश्चित विस्मयचकित करेल अशी नवीन ससंदर्भ माहिती ही या पुस्तकाची खास वैशिष्ट्ये. मिलिंद ओक लिखित 'भारतातील विदुषी आणि लेखिका इसवी १ ते १८५७' हे पुस्तक म्हणजे भारताच्या प्रदीर्घ इतिहासातील वेगवेगळ्या टप्प्यातील स्त्री साहित्यिकांची आणि त्या अनुषंगाने भारतातील स्त्रियांच्या क्षमतांची व सामाजिक स्थितीची वास्तविक जाणीव करून देते. इसवी सन २००० पर्यंत भारतीय स्त्री नेमकी कुठे होती याचा धांडोळा घ्यायचा असेल तर हे उत्तम संदर्भ ग्रंथ ठरेल.

गौरी सुमंत-डोखळे

९१३०००८३७१

काळसर पार्श्वभूमीवर सोनेरी प्रकाशाची छटा, त्यावर खजुराहो मंदिरात कोरलेल्या, १०-११ व्या शतकातील चंदेल राजघराण्याच्या काळातील पत्रलेखन करणाऱ्या सूरसुंदरीच्या शिल्पाचे चित्र आणि त्या चित्राच्या खाली ग्रंथ, वीणा, दौत, मोरपंख आदी प्रतीके धारण केलेल्या शुभ्रवस्त्रधारिणी सरस्वतीचे अर्धाकृती चित्र... असे देखणे मुखपृष्ठ असलेले हे पुस्तक नुकतेच हाती आले. भारतातील विदुषींचा वारसा आणि त्यांची अष्टपैलू लेखनपरंपरा दर्शविणारे हे मुखपृष्ठच एवढे प्रभावी होते की नजर काही क्षण त्यावरच खिळली. पुस्तकाचा विषय प्रथमदर्शनीच एवढ्या बोलक्या रूपात समोर येत असेल तर आतमध्ये काय मेजवानी असेल ते वाचण्याची उत्सुकता वाढली आणि लगेच श्री. मिलिंद ओक लिखित 'भारतातील विदुषी आणि लेखिका इसवी १ ते १८५७' हे पुस्तक वाचायला घेतले.

'दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र' या महिलाविषयक अभ्यास केंद्राने हे पुस्तक प्रकाशित केले असून ते एकाच वेळी हिंदी, इंग्रजी व मराठी या तीनही भाषांमध्ये प्रकशित केले गेले आहे. भारताच्या इतिहासातील एका मोठ्या कालखंडामधील भारतीय स्त्री लेखिकांचा अभ्यास या पुस्तकात केला आहे.

भारतातील महिला साहित्यिकांचा विचार करताना मुख्यतः वैदिक काळातील ऋषिका, बौद्ध काळातील भिख्खुणी आणि अलीकडील विसाव्या शतकातील

किंवा आधुनिक महिला लेखिका यांच्यावर जास्त अभ्यास झाला आहे. मात्र इसवी सन एक ते एकोणिसावे शतक या काळातील महिला लेखिकांवर तुलनेने कमी ग्रंथसामुग्री उपलब्ध आहे. त्यामुळे या दुर्लक्षित कालखंडावर प्रकाश टाकण्यासाठी मिलिंद ओक यांनी या काळाची निवड केली. प्रस्तावनेमध्येच त्यांनी पुस्तकाच्या विषय निवडीची करणे, विषयाचा आवाका, तो निश्चित करण्यामागील विचार, संदर्भ व टीप देण्यामागील उद्देश इत्यादी सर्व अगदी स्पष्टपणे सांगितले आहे. ही प्रस्तावना म्हणजे लेखकाच्या लिखाणामागील वैचारिक स्पष्टतेचे प्रतिबिंब आहे असे वाटते.



संपर्क : दृष्टि स्त्री अध्ययन प्रबोधन केंद्र,
१३६० भारत भवन, शुक्रवार पेठ,
बाजीराव रोड, पुणे.
दूरध्वनी ८६६८२१०१७४.

पोर्तुगीज, फ्रेंच आणि विशेषतः इंग्रज हे युरोपीय वसाहतवादी व्यापारी भारतात आले आणि त्यांनी सुधारणावादी, उदारमतवादी विचार, स्त्री शिक्षण इ. आपल्याकडे आणले असा एक मोठा भ्रम पाश्चिमात्यांनी जाणीवपूर्वक भारतीयांच्या मनात भरवून दिला. या अर्धसत्य विमर्शाला छेद देऊन नेमकी सत्य परिस्थिती मांडण्यासाठी मिलिंद ओक यांनी हे पुस्तक लिहिले आहे. त्यासाठी त्यांनी या पुस्तकाची सुरुवात इसवी १ पासून न करता युरोपच्या शिक्षण इतिहासाचा आढावा या प्रकरणापासून केली. जेणेकरून आपण ज्या पाश्चिमात्य मापदंडांवर आपल्या भारताला जोखत आहोत त्यांची वास्तविकतादेखील आपल्या लक्षात यावी. युरोपमध्ये एकोणिसाव्या शतकात स्त्री शिक्षणाची स्थिती कशी होती व त्यासंबंधी समाजात काय विचारधारा होती हे त्यांनी आकडेवारी आणि उदाहरणे देऊन मांडले आहे. भारतात इंग्रजांनी स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली केली असे अनेक भारतीय मानतात. मात्र स्वतः युरोपमध्ये त्याकाळी महिलांना घर आणि मुले सांभाळण्याचे प्रशिक्षण द्यावे असे तत्कालीन वर्तमानपत्रात आलेले संदर्भ पाहताना आश्चर्य वाटते.

पहिल्या प्रकरणात पाश्चिमात्य देशांमधील परिस्थिती तपशीलवार सांगितल्यानंतर दुसऱ्या प्रकरणात लेखकाने १७५७ ते १८५७ या शतकात भारतात मुलींच्या शाळा किती होत्या, प्रदेशवार स्त्री शिक्षणाची आकडेवारी, शाळांची संख्या, शिकायला येणाऱ्या मुलींची संख्या, त्यांची जातीवार आकडेवारी या सर्व नोंदी दिल्या आहेत आणि विशेष म्हणजे ही आकडेवारी, हा तपशील कोठून मिळवला याचे सर्व संदर्भ त्यांनी तळटीपांमध्ये दिले आहेत. त्यामुळे हे पुस्तक वाचताना कोठेही लेखकाची मते वाचकांवर लादली आहेत असे वाटत नाही. उलट ससंदर्भ माहिती वाचताना आपल्या मनात असलेल्या काही पक्क्या मतांवर प्रश्न पडू लागतात.

तिसरे प्रकरण वाचताना मनात १७५७ ते १८५७ या काळात भारतात झालेल्या अज्ञात लेखिकांबद्दल विस्मय आणि अभिमान दोन्ही भावनांची सरमिसळ होत राहते. १७६० च्या काळातील मुद्दुपलानी या देवदासीचे संस्कृत, तेलुगु आणि तामीळ या तीनही भाषांवर प्रभुत्व होते. तिने अष्टपदीसारखे संस्कृत ग्रंथ अनुवादित केले आहेत. गम्मत म्हणजे मुद्दुपलानी या लेखिकेने लिहिलेल्या 'राधिका सांत्वनम' या प्रेमकथेत एवढे उत्कट वर्णन होते की उदारमतवादी इंग्रजांनी त्या पुस्तकाला कामुक आशय हे कारण देऊन बंदी घातली. मुद्दुपलानी, नागरत्नाम्मा, केरळ राजघराण्यातील वेगवेगळ्या स्त्रिया, महाराष्ट्रातील लक्ष्मीदेवी पायगुंड, बंगालमधील द्रवमयीदेवी, निजामाच्या दरबारातील देवदासी महलकाबाई चंदा या सर्वांचे साहित्य क्षेत्रातले योगदान वाचताना थक्क व्हायला होते आणि

विशिष्ट जातींनाच संस्कृत भाषा शिकायचा अधिकार होता, महिलांना शिक्षण मिळत नसे, त्या केवळ देवाच्या पोथ्या किंवा स्त्रोत्र वाचण्यापुरते शिकत, असे कैक समज–गैरसमज दूर होऊ लागतात.

चौथे आणि पाचवे प्रकरण अनुक्रमे इसवी १ ते १७५७ मधील स्त्रियांच्या शिक्षणाची स्थिती आणि त्या काळातील विदुषी व लेखिका असा आहे. हा काळ अर्थातच स्त्री शिक्षणाच्या स्थितीचे दस्तावेजीकरण करण्यासाठी तसा आव्हानात्मक आहे. या काळातील संदर्भ, हस्तलिखिते, ग्रंथ इस्लामी आक्रमकांनी नष्ट केले आहेत हे आपण जाणतो. असे असूनही ताम्रपट, शिलालेख, शिल्पं, राजघराण्यामधील पत्रव्यवहार आणि या सर्वांवर अभ्यासकांनी लिहिलेल्या टिप्पण्या हे सर्व अभ्यासून यामध्ये लेखकाने माहिती दिली आहे हे विशेष. पाचव्या प्रकरणातील गंगादेवी, प्रताप कुंवरी बाई, विश्वास देवी, कांती, चेलुवाम्बा, संचीया होनम्मा, अव्वाई या विदुषींची नावे वाचताना आपण आपला इतिहास अजिबात जाणत नाही ही खंत वाटत राहते. या प्रकरणात जवळपास पन्नास एक महिला लेखिकांची नावे, त्यांनी लिहिलेले ग्रंथ, पत्र, कविता यांचा उल्लेख आहे. या स्त्रिया चतुरस्र लेखन करणाऱ्या आहेत. केवळ कथा–कविताच नाही तर त्या प्रवासवर्णन लिहिणाऱ्या आहेत, रोजनिशी लिहिणाऱ्या आहेत, काहींनी ऐतिहासिक वृत्तांत लिहिले आहेत तर काहींनी ध्यान धारणा, तंत्र, तत्त्वज्ञान यावर ग्रंथ लिहिले आहेत. अशा विद्वान बुद्धिवान लेखिका भारतात जन्माला आल्या आणि त्यांना घडवणारी समृद्ध शिक्षण व्यवस्था भारतात होती हे सातत्याने पुस्तक वाचताना जाणवत राहते.

पुस्तकाच्या शेवटी अत्यंत नेटकेपणाने व सविस्तर टिपणी, संदर्भ आणि ग्रंथसूची दिली आहे. जी या पुस्तकाची अधिकृतता अधोरेखित करते. हे संदर्भ आणि परिशिष्टदेखील वाचकांनी अवश्य वाचावे असे आहेत. परिशिष्ट वाचताना वारंवार वाटत राहते की, भारताच्या इतिहासाचा असा अभ्यास व्हायलाच हवा.

सखोल संशोधन, अभ्यासपूर्ण व संतुलित लेखन, वैचारिक स्पष्टता, विवेचनात्मक व सोप्या भाषेत मांडणी आणि अनेक वाचकांना निश्चित विस्मयचकित करेल अशी नवीन ससंदर्भ माहिती ही या पुस्तकाची खास वैशिष्ट्ये. मिलिंद ओक लिखित 'भारतातील विदुषी आणि लेखिका इसवी १ ते १८५७' हे पुस्तक म्हणजे भारताच्या प्रदीर्घ इतिहासातील वेगवेगळ्या टप्प्यातील स्त्री साहित्यिकांची आणि त्या अनुषंगाने भारतातील स्त्रियांच्या क्षमतांची व सामाजिक स्थितीची वास्तविक जाणीव करून देते. इसवी सन २००० पर्यंत भारतीय स्त्री नेमकी कुठे होती याचा धांडोळा घ्यायचा असेल तर हे उत्तम संदर्भ ग्रंथ ठरेल.

दृष्टि केंद्राच्या कार्यालयात हे पुस्तक विक्रीसाठी उपलब्ध असून तेथे प्रत्यक्ष कार्यालयातून घेतल्यास रु. १५० आणि घरपोच हवे असल्यास रु. २०० अशी याची किंमत आहे.





रसग्रहणात्मक समीक्षा वाङ्मयीन विलसिते

प्रा. श्री. माधव कुलकर्णी हे एक अभ्यासू आणि वैचारिक भूमिका जगणारे व्यक्ती म्हणून सुपरिचित आहेत. सदर संग्रहातील लेखवैविध्यातून त्यांनी सोप्या व अभ्यासपूर्ण भाषेत वाचकांसाठी वैचारिक खजिना खुला केला आहे. यासाठी त्यांचे विशेष अभिनंदन! खासकरून त्यांनी आपल्या लेखनातून उभी केलेली व्यक्तिचित्रणे ही उल्लेखनीय असल्याने त्यांनी भविष्यात अशा व्यक्तिचित्रणांचा संग्रह प्रकाशित करावा ही त्यांच्याकडून अपेक्षा आहे. हे सर्व लेख विविध वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले असल्याने त्यांवरील शब्दमर्यादेचे बंधन असल्याचे जाणवते.

मानसी चिटणीस

९८८११३२४०७

मानव जीवनाच्या सुरुवातीला मानवाच्या उत्क्रांतीच्या काळात त्याला पडलेले प्रश्न आणि त्याच्या मनात आलेले विचारच त्याच्या प्रगतीसाठी कारणीभूत ठरले असावेत. तसे पाहता माणूस हा समूहाने जगणारा प्राणी आहे. अनेक ऋणानुबंध जपत तो सामाजिक होत गेला व समाजनिर्मितीची प्रक्रिया जन्मला येत गेली. यात सतत बदल होत गेले. नियम तयार होत गेले. काही कायम राहिले, तर काही मोडीत काढले गेले. सामाजिक स्तर निर्माण होत गेले. वर्णव्यवस्था अस्तित्वात आल्यावर तर या स्तरांमधली आर्थिक, वैचारिक, सामाजिक विषमता वाढत गेली. समाजाच्या सर्वच स्तरांमध्ये सांस्कृतिक उद्रेक वाढत गेला. यातून सामाजिक, सांस्कृतिक, वैचारिक क्रांती घडल्या, ज्यामुळे समाजातील सर्वच स्तरांमध्ये कमालीचे बदल घडून आले. समाजवाद, साम्यवाद, समता आणि एकता असे विविध कंगोरे या क्रांतींना होते. जे संपूर्ण जगाच्या एकंदरीत सामाजिक बदलांना कारणीभूत होते.

हा सगळा ऊहापोह मांडण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे, सोलापूरचे सेवानिवृत्त प्राध्यापक श्री. माधव कुलकर्णी यांचा साम्यवादापासून विविध टप्पे पार करत समरसतेपर्यंत येऊन स्थिरावलेला वैचारिक लेखसंग्रह 'वाङ्मयीन विलसिते' होय.

आपल्या आजवरच्या लेखनप्रवासात अनेक प्रकारांची वैचारिक अधिष्ठाने, वेगवेगळे इझम्स आणि विभिन्न वैचारिक व्यासपीठे अनुभवणाऱ्या कुलकर्णी यांनी त्या त्या व्यावहारिक भूमिकेचा विचार त्रयस्थ व ठामपणे मांडताना अनेक अभ्यासू निरीक्षणे नोंदवली, त्याचा परिपाट म्हणजे सदरचा संग्रह होय. ज्ञानेश्वर माऊलींनी आपले गुरू निवृत्तीनाथ यांच्याकडे विश्वकल्याणाची मागणी केली. 'जो जे वांछिल तो ते लाहो...' असे म्हणताना समाजातील विषमता नष्ट करून सर्वांना समान भाग मिळावा अशीच प्रार्थना केली. कदाचित 'वसुधैव कुटुंबकम' ही जी भारतीय विचारपरंपरेने संपूर्ण जगाला दिलेली समता, एकता आणि समरसतेची देणगी आहे; या देणगीचा पुरस्कार सर्व प्रकारच्या वैचारिक वादांचा अभ्यास केल्यानंतर प्रा. कुलकर्णी यांना करावासा वाटला असेल.



संग्रहात जवळपास अठ्ठेचाळीस प्रकारचे लेख असून याआधी ते विविध वृत्तपत्रे, मासिके, विशेष अंक यांमधून प्रकाशित झालेले आहेत. या लेखांमध्ये वैचारिक लेखांबरोबरच काही प्रासंगिक, ललित, समीक्षात्मक, रसग्रहणे, काही प्रस्तावना आणि काही विशेष व्यक्तिचित्रणे यांचाही समावेश आहे. डॉ. आंबेडकर यांच्या वैचारिक भूमिकेचा आणि स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या समग्र साहित्याचा अभ्यास करणारे लेख यात समाविष्ट आहेत. सामाजिक बदल घडवून आणणाऱ्या कार्ल मार्क्स याच्या विचारासोबत बसवेश्वरांची समतेची चळवळ पुढे नेणाऱ्या अनेक विचारवंतांचा यात समावेश होतो. चिदंबर महास्वामी यांच्याही व्यक्तिचित्राचा परिचय संग्रहातील स्वतंत्र लेखामधून वाचकांना होतो. आपले शिक्षक, मार्गदर्शक व गुरू असलेले डॉ. निर्मलकुमार फडकुले यांच्या आठवणी व वैचारिक अध्यासनाची मांडणी करणारे लेख या संग्रहात कुलकर्णी यांनी समाविष्ट केले आहेत. यावरून फडकुले यांच्या व्यक्तिमत्त्वाचा त्यांच्यावर असलेला प्रभात अधोरेखित होताना दिसतो.

सोबतच सोलापूरची साहित्य परंपरा, संतविचारातील विज्ञानवाद, संस्कृती यांचा ऊहापोह करणारे काही लेख आवर्जून संग्रहात समाविष्ट केले गेले आहेत, तर 'माझी काळी आई' हा आत्मकथनात्मक व वाचनीय लेखदेखील आहे. माजी मंत्री असलेले श्री. आनंदराव देवकाते, कवी सजीव, राम गणेश गडकरी, समर्थ रामदास, दत्ता हलसगीकर अशी वैविध्यपूर्ण व्यक्तिचित्रणेदेखील आहेत. प्रा. कुलकर्णी यांनी काही पुस्तकांना लिहिलेल्या अभ्यासू प्रस्तावनांचाही समावेश सदर संपादित ग्रंथात आपल्याला पाहवयास मिळतो.

संतांची समाजातील विषमता दूर करण्यामागची तळमळ, त्यांची विज्ञाननिष्ठ भूमिका, अद्वैतवाद, नवविधा भक्ती आणि उपासना पद्धती यांतून लेखकाची आध्यात्मिक

प्राणायाम
एक अमृतानुभव
लेखक - योगतज्ज्ञ मनोज पटवर्धन
आनंदी, निरामय जीवनासाठी सध्या **प्राणायामाला** पर्याय नाही.
त्यामुळे **आजच आपली प्रत नोंदवा आणि आपले आयुष्य सुंदर करा!**


प्राणायाम कोणता करावा, कसा करावा, किती करावा, कधी करावा? या सर्व प्रश्नांची उत्तरे या एका पुस्तकातून आपल्याला मिळतील.
किंमत : २५०/- रु.
१० टक्के सवलतीत उपलब्ध
Accounts details. - HINDUSTHAN PRAKASHAN SANSTHA
BANK OF MAHARASHTRA
Branch : PRABHADEVI
A/C no. : 20109800154
IFSC no : MAHB0000318
संपर्क : ९५९४९६१८५८
शिकु या प्राणायाम सहज सोप्या पद्धतीने

बैठक व अभ्यास दिसून येतो.

अनेक प्रकारची विचार मांडणी, विषयांतील वैविध्य आणि भूमिका यांना स्पर्श करणारे लेखन करताना प्रा. श्री. माधव कुलकर्णी यांच्यामधील सव्यसाची लेखकाचा व अभ्यासकाचा वारसा दिसून येतो. यातील बरेचसे लेख हे प्रासंगिक व व्यक्तिचित्रण करणारे असल्याने प्रत्येक लेख हा विषयाशी प्रामाणिक राहण्याच्या भूमिकेतून लिहिला असल्याचे जाणवते.

कार्ल मार्क्सच्या साम्यवादी भूमिकेची सोप्या शब्दांत मांडणी करताना, आर्थिक समानतेबरोबर संघर्षरहित शांत, संतुलित समाजाकडे जाण्याची कल्पना समरसतेच्या पुरस्कारातून लेखकाने मांडली आहे. साम्यवाद हा आर्थिक विषमता दूर करतो; तर सामाजिक समरसता शांतता, सांस्कृतिक ऐक्य व मानवतेवर भर देते. मानवजातीचा संपूर्ण आजवरचा इतिहास पाहता समरसतेमध्ये प्रत्येक व्यक्ती आर्थिक पातळीवर सुरक्षित असतेच, पण त्याबरोबरच तिच्या विचारांना, भावनांना, स्वातंत्र्याला मान मिळतो या वैचारिक भूमिकेवर लेखक स्थिरावलेला दिसतो.

शेवटी उत्क्रांती जसजशी होत जाईल; तसतसा तिचा वैचारिक मार्ग समानतेच्या पायावरच उभा आहे हे सिद्ध होत राहील. सह-अस्तित्वाचे ध्येयच समाजाला सुरक्षितता आणि स्थैर्य देऊ शकते आणि तरच भविष्यातील समाज शांत, न्याय्य, संतुलित आणि खऱ्या अर्थाने प्रगत होईल, हीच वैचारिकता लेखकाने या संग्रहातील लेखांमधून मांडल्याचे जाणवते.

प्रा. श्री. माधव कुलकर्णी हे एक अभ्यासू आणि वैचारिक भूमिका जगणारे व्यक्ती म्हणून सुपरिचित आहेत. सदर संग्रहातील लेखवैविध्यातून त्यांनी सोप्या व अभ्यासपूर्ण भाषेत वाचकांसाठी वैचारिक खजिना खुला केला आहे. यासाठी त्यांचे विशेष अभिनंदन! खासकरून त्यांनी आपल्या लेखनातून उभी केलेली व्यक्तिचित्रणे ही उल्लेखनीय असल्याने त्यांनी भविष्यात अशा व्यक्तिचित्रणांचा संग्रह प्रकाशित करावा ही त्यांच्याकडून अपेक्षा आहे. हे सर्व लेख विविध वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले असल्याने त्यांवरील शब्दमर्यादेचे बंधन असल्याचे जाणवते.अन्यथा प्रदीर्घ लेखनासाठी पूरक असेच या सर्व लेखांचे विषय आहेत. तेव्हा आपल्या लेखनातून त्यांनी वाचकांसाठी असेच विविध वैचारिक खाद्य पुरवावे, यासाठी प्रा. श्री. माधव कुलकर्णी यांना शुभेच्छा!

डॉ. शरणकुमार लिंबाळे यांची १००व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड



ख्यातनाम दलित साहित्यिक व समीक्षक डॉ. शरणकुमार लिंबाळे मराठी साहित्य क्षेत्रातील नामवंत साहित्यिक असून दलित समाजाच्या वेदना त्यांनी आपल्या साहित्यातून आधोरेखित केल्या आहेत.

'सरस्वती सन्मान' मिळवणारे भारतातील पहिले दलित लेखक आहेत. त्यांनी ४७हून अधिक पुस्तकांचे लेखन असून त्यांच्या पुस्तकांचे अनेक भाषांमध्ये भाषांतर. भाषांतरीत पुस्तकांची संख्या ८७ इतकी आहे. अनेक विद्यापीठांच्या अभ्यासक्रमात त्यांच्या पुस्तकांचा समावेश झाला असून त्यांची 'अक्करमाशी' ही आत्मकथा बहुचर्चित आहे. या निवडीबद्दल समरसता साहित्य परिषदेकडून डॉ. शरणकुमार लिंबाळे यांचे मन:पूर्वक अभिनंदन!



सनातन वैदिक ग्रंथपरंपरेचा अर्थपूर्ण परिचय

रामायण आणि महाभारतातील कथांकडे पाहताना नातेसंबंध, कर्तव्य आणि निर्णयांमधील गुंतागुंत उलगडते. प्रश्न विचारण्याला दिलेले स्थान हे या विवेचनातील महत्त्वाचे सूत्र आहे. वेदांमधील ज्ञानचिंतन, उपनिषदांतील आत्मशोध, रामायण-महाभारतातील नैतिक मूल्ये, भगवद्गीतेतील कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग तसेच पुराणे आणि संतपरंपरेतील लोकाभिमुख विचार यांची सूत्रबद्ध ओळख लेखक करून देतात.

श्रीराम नानल

९४२३०३४०५०

ग्रंथपरंपरेची ओळख करून देणारे पुस्तक

वेद, उपनिषदे, रामायण, महाभारत, भगवद्गीता आणि पुराणे ही आपल्या सांस्कृतिक परंपरेची अनमोल वैचारिक संपदा आहे. मात्र या ग्रंथांचे स्वरूप, त्यांचे परस्परसंबंध आणि त्यामागील जीवनदृष्टी समजून घेण्याची संधी सर्वसामान्य वाचकांना फारशी मिळत नाही. माधव जोशी लिखित 'वैदिक हिंदू ग्रंथपरंपरा : स्वरूप, सार आणि संवाद' हा ग्रंथ ही उणीव भरून काढणारा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न आहे.

लेखकाची अभ्यासपूर्ण लेखनशैली

उद्योग, व्यवस्थापन आणि कायदा या क्षेत्रातील साडेपाच दशकांचा अनुभव असलेल्या जोशींचा लेखनप्रवास विविध विषयांतून झाला आहे. त्यांना रतन टाटा यांचा दीर्घ सहवास लाभला. गतवर्षी 'संविधान सर्वांसाठी' या पुस्तकातून त्यांनी संविधानाची ओळख अवघ्या १२० पानांत करून दिली. गुंतागुंतीचा विषय सामान्य वाचकाला समजेल अशा भाषेत मांडण्याची त्यांची हातोटी आणि कौशल्य या पुस्तकातही जाणवते.

हजारो वर्षांच्या विचारांनी, प्रश्नांनी आणि अनुभवांनी घडलेल्या या परंपरेतील प्रत्येक विषयावर स्वतंत्र ग्रंथ होऊ शकेल. तरीही तपशिलांच्या गर्दीत वाचक गोंधळणार नाही, याची काळजी घेत लेखकाने विषयाची सूत्रबद्ध मांडणी केली आहे.

तेरा विभागांतून ग्रंथपरंपरेचा विस्तृत पट

हिंदू धर्माची संकल्पना, त्याची वैचारिक बैठक आणि ग्रंथपरंपरेचा व्यापक आवाका यांचा परिचय या पुस्तकातून होतो. पुस्तकाचे तेरा विभाग असून त्यांतून वैदिक हिंदू ग्रंथपरंपरा विषयवार आणि क्रमबद्ध पद्धतीने स्पष्ट केली आहे. सनातन संस्कृती ही केवळ उपासना किंवा कर्मकांडांची परंपरा नसून ती एक जीवनपद्धती आहे, हा विचार लेखक प्रभावीपणे मांडतात. आपल्या परंपरा कोणत्या, त्यामागील शास्त्रीय आणि सामाजिक हेतू काय, असे विशेषतः नव्या पिढीला पडणारे प्रश्न लेखक समजूतदारपणे हाताळतात.



वैदिक हिंदू ग्रंथपरंपरा :
स्वरूप, सार आणि संवाद
लेखक : माधव जोशी
प्रकाशक : ग्रंथाली
पृष्ठे : १८० मूल्य : ३०० रु.

वेद, उपनिषदे, वेदांगे, रामायण, महाभारत, भगवद्गीता आणि पुराणे यांचा परिचय देत पुस्तक पुढे जाते. दर्शनशास्त्रे, संस्कार आणि भक्तिपरंपरा यांनाही त्यात स्थान मिळाले आहे. ही केवळ विषयांची सूची नाही. उपनिषदांतील आत्मचिंतन, महाकाव्यांतील नैतिक पेच आणि भक्तिपरंपरेतील अनुभव मानवी जीवनातील प्रश्नांना कसे भिडतात, हे लेखकाने प्रभावी शब्दांत मांडले आहे.

ग्रंथांमधून जीवनमूल्यांचा शोध

रामायण आणि महाभारतातील कथांकडे पाहताना नातेसंबंध, कर्तव्य आणि निर्णयांमधील गुंतागुंत उलगडते. प्रश्न विचारण्याला दिलेले स्थान हे या विवेचनातील महत्त्वाचे सूत्र आहे. वेदांमधील ज्ञानचिंतन, उपनिषदांतील आत्मशोध, रामायण–महाभारतातील नैतिक मूल्ये, भगवद्गीतेतील कर्मयोग, ज्ञानयोग आणि भक्तियोग तसेच पुराणे आणि संतपरंपरेतील लोकाभिमुख विचार यांची सूत्रबद्ध ओळख लेखक करून देतात.

परंपरा आणि आधुनिकतेचा समन्वय

या पुस्तकाचे वैशिष्ट्य म्हणजे लेखकाचा दृष्टिकोन केवळ अभिमानाचा नाही, तर शोधक वृत्तीचा आहे. परंपरेतील प्रत्येक गोष्ट डोळसपणे समजून घेण्याची आणि तिच्यामागील उद्देश जाणून घेण्याची प्रामाणिक इच्छा त्यांच्या लेखनातून जाणवते.

श्रद्धा आणि विवेक, परंपरा आणि आधुनिकता, प्राचीन ज्ञान आणि वर्तमानकालीन प्रश्न यांच्यात संवाद घडवून आणणे हे या ग्रंथाचे महत्त्वाचे योगदान आहे. विशेषतः एखाद्या परंपरेचे अंधानुकरण करण्याऐवजी तिचा काळ, समाज आणि मानवी अनुभव यांच्या संदर्भात अर्थ समजून घ्यावा, ही लेखकाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. विविध विचारधारांचे सहअस्तित्व आणि प्रश्न विचारण्याचे स्वातंत्र्य ही भारतीय चिंतनपरंपरेची बलस्थानेही यातून अधोरेखित होतात.

हिंदू परंपरेतील संस्कार याविषयी अकराव्या अध्यायात विस्तृत चर्चा असून १६ प्रमुख संस्कारांचा अर्थ विशद करण्यात आला आहे. काळानुरूप संस्कारांची आधुनिक पुनर्मांडणी करावी असेही ते सुचवतात. हिंदू धर्माविषयी विश्लेषण करताना ते भागवत धर्माविषयी आदराने आणि ममतेने लिहितात हे विशेष.

परंपरा नव्हे, संवाद' – लेखकाची मध्यवर्ती भूमिका

पुस्तकातील शेवटचा तेरावा अध्याय 'परंपरा नव्हे, संवाद' हा विशेष उल्लेखनीय आहे. या शीर्षकातूनच लेखकाची भूमिका स्पष्ट होते. परंपरा म्हणजे केवळ पूर्वापार चालत आलेल्या गोष्टींचे जतन किंवा अंधानुकरण नव्हे, तर त्यांच्याशी सतत संवाद साधणे, त्यांचा अर्थ तपासणे आणि बदलत्या काळाच्या संदर्भात त्यांचे महत्त्व समजून घेणे होय. प्राचीन ज्ञानपरंपरेचा आधुनिक समाजाशी संवाद घडवून आणण्याची लेखकाची भूमिका या अंतिम अध्यायातून अधिक स्पष्ट होते. पुस्तकाच्या

संपूर्ण विवेचनाला एक वैचारिक दिशा देणारा हा समारोप आहे.

अभ्यासक आणि जिज्ञासू वाचकांसाठी प्रवेशद्वार

इतका प्रचंड आवाका असलेला विषय केवळ १८० पानांत मांडणे हे आव्हानात्मक काम आहे. लेखकाने संशोधकाच्या जिज्ञासेने आणि सामान्य वाचकांपर्यंत हा विषय पोहोचावा या विनम्र भावनेने त्याला स्पर्श केला आहे. त्यामुळे अभ्यासकांना पुढील संशोधनाची दिशा मिळते, तर जिज्ञासू वाचकांची बौद्धिक भूक भागवण्यास मदत होते.

अलका द. मुतालिक यांची प्रस्तावना विषयाची पार्श्वभूमी तयार करते.

भारतीय भाषा मधून व्यापक वाचकांपर्यंत या पुस्तकाचा इंग्रजी, हिंदी, कन्नड, तामीळ, तेलुगू आणि गुजराती या भाषांमध्ये अनुवाद प्रकाशित होणार आहे, ही विशेष आनंदाची बाब आहे. त्यामुळे भारतीय वैचारिक आणि सांस्कृतिक ग्रंथपरंपरेचा हा परिचय देशातील विविध भाषिक वाचकांपर्यंत, तसेच इंग्रजी भाषेतील अभ्यासकांपर्यंत पोहोचण्यास मदत होईल. विविध भाषांमधील वाचकांना आपल्या प्राचीन ज्ञानपरंपरेचे स्वरूप, सार आणि तिच्यामागील विचार समजून घेण्याची संधी या माध्यमातून उपलब्ध होईल.अर्थात, एवढ्या संक्षिप्त पुस्तकातून प्रत्येक ग्रंथाचा सखोल अभ्यास अपेक्षित नाही. विषयाचे प्रवेशद्वार म्हणून या पुस्तकाची उपयुक्तता आहे, हे अभ्यासू वाचकांनी लक्षात घ्यावे.

सुंदर निर्मिती आणि महत्त्वपूर्ण वैचारिक योगदान

एवढ्या संक्षिप्त पुस्तकातून असा वेगळा आणि महत्त्वपूर्ण विषय मांडल्याबद्दल लेखक माधव जोशी यांचे अभिनंदन. तसेच पुस्तकाचा सुबक लेआऊट, मांडणी आणि उत्कृष्ट छपाई यांबद्दल ग्रंथालीचेही विशेष अभिनंदन.

आपल्या संस्कृतीचा अभिमान बाळगण्याबरोबरच तिचा अर्थ समजून घेण्याची आणि तिच्याशी संवाद साधण्याची प्रेरणा देणारा हा ग्रंथ प्रत्येक जिज्ञासू वाचकाने वाचावा.



विवेक पुस्तक प्रकाशन

संघ जगणारा माणूस

लेखक - रवींद्र गोळे

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने गेल्या शंभर वर्षांत असंख्य कार्येकर्ते तयार केले . ज्यांनी आपल्या जीवनाला संघस्पर्श करून घेतला आणि जगण्याचा ध्यास आणि श्वास संघ झाला अशापैकी एक पद्मश्री रमेश पतंगे. लेखक, विचारवंत, पत्रकार, समाजचिंतक अशा विविध भूमिका पार पाडताना संघाचा विचार प्रकट करणाऱ्या रमेश पतंगेचे शब्दचित्र म्हणजे संघ जगणारा माणूस

मूळ किंमत २२५/-, सवलत मूल्य २००/-

संपर्क : कार्यालय -७५०६७३२९०५
आणि स्थानिक प्रतिनिधी

Bank Details - Hindustan Prakashan Sanstha
Bank Of Maharashtra, Prabhdevi Branch
IFSC Code - MAHB0000318
A/C No. 20109800154



भक्तीच्या माध्यमातून समतेचा संदेश देणारे संत रविदास

'क्रांतिकारी संत रविदास' हे पुस्तक लाखे प्रकाशनाने प्रकाशित केले असून या पुस्तकातील काव्यरचना, त्यांचे अर्थ, संत परंपरेचा परिचय आणि ऐतिहासिक आख्यायिका यांमुळे पुस्तकाचा आशय अधिक समृद्ध झाला आहे. संत रविदासांचे जीवनकार्य समजून घेण्याबरोबरच त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तताही या पुस्तकातून अधोरेखित होते.

निर्मिती वनगले

९०८२९३३९१३

सध्या घड्याळाच्या काट्यांसोबत पळता पळता आपण स्वतःलाच विसरून जातो. अशा या धावपळीत काही पुस्तके मनाला शांत विसावा देऊन जातात. माणसाला माणूस म्हणून जगण्याची शिकवण देतात. संतांचे विचार आणि त्यांचे कार्य आपल्याला पुन्हा एकदा अंतर्मुख करतात.

हेचि दान देगा देवा । तुझा विसर न व्हावा ।।१।।
गुण गाईन आवडी । हेचि माझी सर्व जोडी ।।२।।
न लगे मुक्ती आणि संपदा । संतसंग देई सदा ।।३।।
तुका म्हणे गर्भवासी । सुखे घालावे आम्हासी ।।४।।

संत तुकारामांनी या अभंगात हेच सांगितले आहे की, हे देवा मला तुझा कधीही विसर पडू नये, हेच एक दान मला दे. तुझे गुण आवडीने गाणे हीच माझी खरी संपत्ती आहे. पुढे ते असे लिहितात की, मला मुक्ती (मोक्ष) किंवा ऐहिक धनसंपत्ती नको, तर मला सदैव संतांचा सहवास दे. संतसंग मिळणार असेल तर मला पुनः पुन्हा जन्म मिळाला तरी चालेल. तसेच आपणही त्याच संतांच्या आयुष्यातील काटे-फुले वेचण्यात व वाचण्यात जिवन व्यतित केले पाहिजे.

संतांच्या विचारांचा आणि त्यांच्या जीवनकार्याचा परिचय करून देणारे असेच एक पुस्तक म्हणजे डॉ. ईश्वर नंदपुरे लिखित 'क्रांतिकारी संत रविदास.' केवळ महाराष्ट्रालाच नव्हे, तर संपूर्ण भारताला समृद्ध संत परंपरेचा वारसा लाभला आहे. या संतांनी समाजाला भक्तिमार्ग दाखवण्याबरोबरच भक्तीच्या माध्यमातून सामाजिक सुधारणेचेही कार्य केले. अशाच भक्ती चळवळीतील महत्त्वाचे संत, कवी आणि समाजसुधारक संत रविदास यांच्या

जीवनकार्याचा परिचय या पुस्तकातून करून देण्यात आला आहे.



हे पुस्तक केवळ संत रविदासांच्या कार्याचा आढावा घेत नाही, तर त्यांनी समाजात घडवून आणलेल्या क्रांतिकारी परिवर्तनाचा आलेखही मांडते. सध्या जगभरात रशिया-युक्रेन युद्ध आणि इराण-इस्रायल-अमेरिका संघर्षामुळे अस्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. युद्धांमुळे सैनिक आणि सामान्य नागरिकांना आपले प्राण गमवावे लागत आहेत, तर जागतिक अर्थव्यवस्थेलाही त्याचा मोठा फटका बसत आहे. अशा परिस्थितीत अहिंसा, करुणा, दया, क्षमा आणि शांततेचा संदेश देणाऱ्या भारतीय संतांच्या विचारांचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. युद्धखोर प्रवृत्तीला नकार देऊन समाजात मानवता आणि शांततेची भावना रुजवण्याच्या उद्देशाने लेखक डॉ. ईश्वर नंदपुरे यांनी या पुस्तकाची निर्मिती केली आहे.

या पुस्तकातून वाचकांना गुरुपरंपरेचीही माहिती मिळेल. स्वामी रामानंद हे संत रविदासांचे गुरू होते. त्यांनी उत्तर प्रदेशमध्ये जातीबंधने शिथिल केली. त्यांचे शिष्य ही वेगवेगळ्या जातीतील होते. रामभक्तीचा सर्वांना सारखाच अधिकार आहे असे सांगत त्यांनी त्या काळातील असलेल्या सामाजिक अस्पृश्यतेला विरोध केला. त्यांनी धर्मप्रसारासाठी संस्कृत ऐवजी हिंदी भाषेचा उपयोग केला. भारतीय संतांनी मानवता, समता, भक्ती आणि नैतिक जीवनमूल्यांची शिकवण दिली. त्यांनी कर्मकांडापेक्षा खऱ्या भक्तीला आणि माणसाच्या अंतःकरणाच्या शुद्धतेला जास्त महत्त्व दिले.

या पुस्तकाचे एक वैशिष्ट्य म्हणजे यात संत रविदासांच्या काव्यरचनांचाही समावेश करण्यात आला आहे. काव्यरचनेसोबत त्यांचा अर्थही देण्यात आला आहे. त्यामुळे वाचकांना संत रविदासांच्या विचारविश्वाचा आणि त्यांच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणिवांचा परिचय होतो. स्वामी रामानंद यांनी संत रविदासांच्या बालपणाशी संबंधित काही आख्यायिकांचे वर्णनही या पुस्तकात केले आहे. तसेच संत रविदासांची वंशावळीही या पुस्तकात दिलेली आहे.

याशिवाय संत कबीर, संत सेना न्हावी, संत पीपा, संत अनंतानंद, संत सुखानंद, संत सुरसुरानंद आणि सुरासुरी, संत नरहर्यानंद, संत धन्ना, गुरुनानक व संत रोहिदास यांच्यातील गुरुबंधू नातेसंबंध स्पष्ट केले आहेत. या माहितीमुळे संत परंपरेतील परस्परसंबंध आणि त्या काळातील भक्ती चळवळीचा व्यापक आवाका समजण्यास मदत होते.

या पुस्तकातून संत रविदासांनी दिलेल्या आध्यात्मिक एकात्मता, सामाजिक समता-समानता, भावनात्मक एकात्मता, अंधश्रद्धा निर्मूलन, श्रमप्रतिष्ठा आणि 'मन सर्वश्रेष्ठ' यांसारख्या महत्त्वपूर्ण उपदेशांची माहिती मिळते. त्यांनी मनाच्या शुद्धतेला विशेष महत्त्व दिले. तसेच कर्मकांड आणि जातीव्यवस्थेवर टीका करून सर्व माणसे समान असल्याचा विचार मांडला. त्यांच्या या उपदेशांतून माणुसकी, बंधुभाव आणि समानतेचा संदेश मिळतो.

'क्रांतिकारी संत रविदास' हे पुस्तक लाखे प्रकाशनाने प्रकाशित केले असून या पुस्तकातील काव्यरचना, त्यांचे अर्थ, संत परंपरेचा परिचय आणि ऐतिहासिक आख्यायिका यांमुळे पुस्तकाचा आशय अधिक समृद्ध झाला आहे. संत रविदासांचे जीवनकार्य समजून घेण्याबरोबरच त्यांच्या विचारांची आजच्या काळातील उपयुक्तताही या पुस्तकातून अधोरेखित होते.

आजच्या सामाजिक परिस्थितीत समता, बंधुभाव, मानवता आणि शांततेची शिकवण देणाऱ्या संतांच्या विचारांची गरज अधिक आहे. त्यामुळे संत रविदासांचे जीवन आणि कार्य जाणून घेऊ इच्छिणाऱ्या वाचकांसाठी हे पुस्तक निश्चितच उपयुक्त ठरते. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी वाचावे आणि संग्रही ठेवावे, असे हे पुस्तक आहे.



ज्ञानेश्वर : संत परंपरेच्या भावविश्वातील आद्यस्वर

ज्ञानेश्वरांचे प्रभावक्षेत्र म्हणजे अध्यात्मापासून समाज जीवनापर्यंत, मराठी भाषेपासून लोकसंस्कृतीपर्यंत आणि आळंदीपासून पंढरीच्या वारीपर्यंत पसरलेले एक विशाल सांस्कृतिक विश्व आहे. त्यांनी ज्ञानाला भक्तीची भाषा दिली आणि भक्तीला लोकजीवनाची वाट दिली. म्हणूनच सातशे वर्षांहून अधिक काळ लोटला तरी ज्ञानेश्वर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीत अजूनही जिवंत आहेत. याची खरी प्रचीती आषाढी, कार्तिकीच्या पंढरीच्या वारीच्या निमित्ताने येते. 'रामकृष्ण हरी' आणि 'जय हरी विठ्ठल'सोबतच 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम' किंवा 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' यासारख्या नामघोषाने अवघी पंढरीची वाट दुमदुमून जाते.

डॉ. माया परते-रंभाळे

९९७०२३७२२१

महाराष्ट्राच्या संत परंपरेच्या आकाशात अनेक तेजस्वी नक्षत्रे आहेत; पण त्या आकाशाला एका विलक्षण आध्यात्मिक प्रकाशाने उजळून टाकणारा ज्ञानसूर्य म्हणजे संत ज्ञानेश्वर. संत ज्ञानेश्वर हे केवळ तेराव्या शतकातील संतकवी नव्हते, ते मराठीच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जडणघडणीतील एक युगपुरुष होते. त्यांच्या विचारांचा प्रभाव धर्म, अध्यात्म, साहित्य, समाजजीवन आणि लोकपरंपरा अशा अनेक क्षेत्रांवर पडलेला दिसतो. ज्ञानेश्वरांनी 'ब्रह्मविद्येचा सुकाळ' करण्यासाठी भगवद्गीतेच्या गोड तत्त्वज्ञानाचा आशय सामान्य माणसाला समजेल अशा मराठी भाषेत मांडला. ज्ञानेश्वरीमधून कर्मयोग, भक्तीयोग, ज्ञानयोग, आत्मस्वरूप आणि विश्वात्मकतेचा विचार सहज, सोप्या भाषेत सांगितला. त्यामुळे अध्यात्म हे केवळ सिद्धांताच्या चर्चेपुरते न राहता लोकजीवनाचा भाग बनले. त्यांनी मराठीला केवळ शब्दांची भाषा न ठेवता ती अनुभूतीची, अध्यात्माची आणि लोकजीवनाची भाषा केली. त्यांचे सर्वात मोठे योगदान म्हणजे मराठी भाषेला तत्त्वज्ञान व्यक्त करण्याची समर्थ भाषा बनवणे. 'ओवी' या लोकाभिमुख छंदातून त्यांनी गहन तत्त्वज्ञान सोप्या शब्दांत मांडले. त्यांच्या 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांनी मराठी साहित्याला अभिजात उंची प्राप्त करून दिली. त्यांनी मराठी संत परंपरेच्या भावविश्वाला जणू एक

मूलस्वर दिला. नामदेवांच्या सख्यभक्तीत, एकनाथांच्या समतेत, तुकारामांच्या आत्मसंवादात आणि पुढील वारकरी संतांच्या विठ्ठल प्रेमात ज्ञानेश्वरांच्या अध्यात्माची एखादी तरी छटा जाणवते. त्यांनी सांगितलेला सर्वात्मभाव, 'हे विश्वचि माझे घर' अशी व्यापक दृष्टी, भक्तीतील प्रेम, ज्ञानातील विनय आणि सर्व जीवनाविषयीची करुणा यांनी मराठी संतांच्या भावविश्वाला एक विशाल क्षितिज दिले. आणि म्हणूनच ज्ञानेश्वर हे केवळ 'ज्ञानेश्वरीचे कर्ते' राहात नाहीत; तर ते मराठी संत भावविश्वाचे एक जीवनदायी अधिष्ठान बनतात. त्यांनी भक्तीला जात-पात, विद्वत्ता किंवा कर्मकांडाच्या मर्यादेत बंदिस्त न ठेवता ती सर्वसामान्यांसाठी खुली केली. पुढे संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम आदी संतांच्या परंपरेत या विचारांचा मोठा प्रभाव जाणवतो. वारकरी संप्रदायाच्या वैचारिक पायाभरणीत ज्ञानेश्वरांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे.

'ज्ञानेश्वरी' हा एक वाग्यज्ञ आहे. त्यातून अखंड स्फुरणाऱ्या अनुभवांच्या ज्वालेतून मराठी संतांनी आपली आंतरिक ज्योत प्रज्वलित करून घेतली आहे. 'ज्ञानेश्वरी' हा आध्यात्मिक ज्ञानाचा जणू महासागर आहे. संतांनी या ज्ञानसागरातून आपल्या वाणीचे पाट काढून दिले आहेत. त्यामुळे संत काव्यातून पुन्हा ज्ञानेश्वरीच पाझरताना दिसते असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. संत बहिणाबाईने आपल्या अभंगांतून ज्ञानेश्वरीस वारकरी संप्रदायाच्या इमारतीचा पाया मानले आहे, ते अगदी सार्थ वाटते.

'ज्ञानदेवे रचिला पाया । उभारिले देवालया।
नामा तयाचा किंकर । तेणे केला हा विस्तार।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत।
तुका झालासे कळस । भजन करा सावकाश।'

संपूर्ण परंपरेचे हे सुंदर रूपक बहिणाबाईंनी आपल्या अभंगातून मांडले आहे. ज्ञानेश्वरांनी अध्यात्म साधनेचा, संतत्वाचा व नैतिकतेचा श्रेष्ठ आदर्श उत्तरकालीन संतांसमोर ठेवला. त्यास अनुसरूनच पुढील संतांनी वाटचाल केलेली दिसते. ज्ञानेश्वरांनी संतांच्या आध्यात्मिक साहित्याची वाटचाल अशी सुकर करून अवघ्या संतांना उपकृत आणि संत साहित्यास प्रभावित केले.



ज्ञानेश्वरांच्या विचारांमध्ये सर्व जिवांमध्ये एकच चैतन्य आहे ही समत्वाची भावना केंद्रस्थानी आहे. 'जो जे वांछील तो ते लाहो प्राणिजात' ही 'पसायदाना'तील मंगल कामना त्यांच्या विश्वकल्याणाच्या भूमिकेचे दर्शन घडवते. त्यामुळे त्यांचा संदेश केवळ व्यक्तिगत मोक्षाचा न राहता समाजकल्याणाचा बनतो.

ज्ञानेश्वरांचे प्रभावक्षेत्र म्हणजे अध्यात्मापासून समाज जीवनापर्यंत, मराठी भाषेपासून लोकसंस्कृतीपर्यंत आणि आळंदीपासून पंढरीच्या वारीपर्यंत पसरलेले एक विशाल सांस्कृतिक विश्व आहे. त्यांनी ज्ञानाला भक्तीची भाषा दिली आणि भक्तीला लोकजीवनाची वाट दिली. म्हणूनच सातशे वर्षांहून अधिक काळ लोटला तरी ज्ञानेश्वर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक स्मृतीत अजूनही जिवंत आहेत. याची खरी प्रचीती आषाढी, कार्तिकीच्या पंढरीच्या वारीच्या निमित्ताने येते. 'रामकृष्ण हरी' आणि 'जय हरी विठ्ठल'सोबतच 'निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, एकनाथ, नामदेव, तुकाराम' किंवा 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' यासारख्या नामघोषाने अवघी पंढरीची वाट दुमदुमून जाते. चंद्रभागेच्या वाळवंटात ही संतांची

मांदियाळी एकत्र येऊन विठ्ठल नामस्मरणात दंग होऊन गजर करीत असे तिथे आज वारकरी विठ्ठल नामासोबतच संतांच्या नामाचाही गजर करतात. त्यावेळी खऱ्या अर्थाने याची सार्थकता पटते.

ज्ञानेश्वरांचे प्रभावक्षेत्र–

संत ज्ञानेश्वरांच्या आयुष्यातील कार्याचा, विचारांचा, ज्ञानेश्वरीतील तत्त्वज्ञानाचा आणि त्यांच्या भक्तिमार्गाचा प्रभाव त्यांच्या समकालीनांपासून पुढे अनेक शतकांतील संत परंपरेवर झाला. त्यांनी ज्ञान, भक्ती, समत्व आणि लोकभाषा यांचा जो सुंदर समन्वय साधला त्यातून पुढील संत परंपरेला वैचारिक आणि आध्यात्मिक दिशा मिळाली. त्यांच्या विचारांचा प्रकाश शतकानुशतके महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक जीवनाला उजळून टाकत आहे. 'ज्ञानेश्वरी' आणि 'अमृतानुभव' या ग्रंथांनी मराठी भाषेला केवळ साहित्य भाषेचे वैभव दिले नाही; तर सामान्य माणसाला अध्यात्म समजून घेण्याची नवी दृष्टी दिली.

ज्ञानेश्वरांच्या प्रभावाची सर्वात मोठी खूण म्हणजे त्यांच्यानंतरच्या संतांच्या काव्यात जाणवणारी ज्ञानदेवांची उपस्थिती. संत नामदेवांच्या अभंगात ज्ञानदेवांविषयीचा असलेला जिव्हाळा, संत एकनाथांनी ज्ञानेश्वरीचे केलेले पुनरुज्जीवन आणि संत तुकारामांच्या अभंगातून उमटणारा ज्ञानदेवांविषयीचा आदर ही त्या प्रभावाची ठळक रूपे आहेत.

ज्ञानदेवांनी ज्ञान आणि भक्ती यांचा सुंदर समन्वय साधला. अध्यात्म हे केवळ विद्वानांचे क्षेत्र नसून ते सामान्य माणसाच्या जगण्याशी जोडले आहे. हे त्यांनी आपल्या रसाळ वाणीने मराठीतून सांगितले. त्यामुळे त्यांच्या विचारांची प्रभावळ केवळ संतांपुरती मर्यादित राहिली नाही, तर ती वारकरी, कीर्तनकार, प्रवचनकार, साहित्यिक आणि सामान्य भक्त यांच्या जीवनातही विस्तारली. म्हणूनच असे म्हटले जाते की, ज्ञानदेव गेले नाहीत, ते मराठी संत परंपरेच्या विचारात, अभंगात आणि वारकऱ्यांच्या प्रत्येक पावलांत कालानुरूप अधिकाधिक विस्तारात गेले.

ज्ञानेश्वरांचे मोठेपण त्यांच्या ग्रंथात जितके आहे तितकेच त्यांच्या पश्चात निर्माण झालेल्या प्रभावळीतदेखील आहे. एका संताचा प्रभाव दुसऱ्या संताच्या विचारात, अभंगात, कीर्तन परंपरेत आणि लोकश्रद्धेत ज्या प्रकारे झिरपत जातो त्यातून ही प्रभावळ आकार घेते. ज्ञानदेवांच्या बाबतीत ही प्रभावळ दिवसेंदिवस विस्तारत गेली आणि पुढील काळातील संतांच्या वाणीतून नव्याने त्यांचे विचार उमलत गेले.

ज्ञानदेवांनी ज्ञान आणि भक्तीचा सेतू निर्माण केला. त्यांनी ज्ञानमार्ग आणि भक्तीमार्ग यांच्यातील भिंत पाडली. भगवद्गीतेतील गहन तत्त्वज्ञान त्यांनी सामान्य माणसाच्या ओठांवर आणले. संस्कृतमधील तत्त्वज्ञानाला मराठीच्या मायबोलीत आणताना त्यांनी केवळ भाषांतर केले नाही, तर त्याला लोकानुभवाचे रूप दिले. 'देव' हा दूर, अगम्य आणि केवळ कर्मकांडातून प्राप्त होणारा नसून तो आपल्या अंतःकरणात आहे अशी अनुभूती त्यांनी दिली. म्हणूनच ज्ञानेश्वरीतील अध्यात्म हे जीवनापासून दूर जाणारे नाही. उलट जीवन अधिक अर्थपूर्ण करणारे आहे. हीच दृष्टी पुढे वारकरी संप्रदायाच्या केंद्रस्थानी राहिली.

ज्ञानदेवांचा संत परंपरेवर उमटलेला ठसा/प्रभाव – संत नामदेव–

ज्ञानदेव आणि नामदेव यांचे सख्य हे वारकरी परंपरेतील अत्यंत महत्त्वाचे पर्व आहे. ज्ञानदेवांच्या प्रभावळीतील पहिले आणि अत्यंत महत्त्वाचे नाव म्हणजे संत नामदेव. ज्ञानदेव आणि नामदेव यांच्या सहवासाने महाराष्ट्राच्या भक्तीपरंपरेला एक नवे वळण मिळाले. एकीकडे ज्ञानदेवाचे तत्त्वचिंतन आणि दुसरीकडे नामदेवांची सगुण प्रेममयी भक्ती. या दोन प्रवाहांचा सुंदर संगम झाला. नामदेवांच्या अभंगात ज्ञानदेवांविषयी असलेला आदर आणि आत्मीयता जाणवते. 'ज्ञानेश्वरी'बद्दलचा आदर व्यक्त करताना नामदेव म्हणतात,

'नामा म्हणे श्रेष्ठ। ग्रंथ ज्ञानदेवी ।'

ज्ञानदेवांना ते केवळ समकालीन संत म्हणून पाहत नाहीत, तर त्यांच्या आध्यात्मिक उंचीची त्यांना जाणीव आहे. ज्ञानदेवांच्या ज्ञानाला नामदेवांच्या भक्तीची जोड मिळाली आणि ज्ञानोबा–तुकाराम या पुढील वारकरी परंपरेचा पाया अधिक दृढ झाला.

नामदेवांची भक्ती अधिक भावप्रधान असली तरी ज्ञानदेवांच्या सहवासातून त्यांच्या भक्तीला व्यापक, आध्यात्मिक आणि तात्त्विक परिमाण लाभले. ज्ञानदेव–नामदेवांच्या सहवासाच्या कथा पुढे वारकरी परंपरेचा महत्त्वाचा भाग बनला. नामदेवांची भक्ती विठ्ठल चरणी विलीन होणारी, तर ज्ञानदेवांचे चिंतन विश्वाच्या चैतन्याशी एकरूप होणारे. या दोन प्रवाहांचा संगम झाला आणि भक्तीला अधिक व्यापक आध्यात्मिक आशय प्राप्त झाला. नामदेवांचे कार्य एखाद्या दीपशिखेसारखे आहे. स्वतः प्रकाश देत असताना त्या प्रकाशातून असंख्य ज्योती प्रज्वलित होत गेल्या. अनेकांना मार्ग सापडले.

संत एकनाथ–

संत एकनाथांनी ज्ञानदेवांच्या विचार परंपरेला जतन केले. एकनाथांच्या काव्यातून ज्ञान, भक्ती आणि समतेचा समन्वय आढळून येतो. ज्ञानेश्वरांच्या विचारांचा मोठा प्रभाव संत एकनाथांच्या समन्वयवादी भावविश्वात जाणवतो. करुणा, समता, लोककल्याण आणि नामभक्ती यांना एकनाथांनी महत्त्व दिले आहे. जात–पात, उच्च नीच, कर्मकांड यापेक्षा अंतःकरणातील भक्ती श्रेष्ठ आहे, हा विचार ज्ञानेश्वरांच्या सर्वात्मभावाशी जवळचा आहे.

'जे खळांची व्यंकटी सांडो।
तया सत्कार्मी रती वाढो।' (ज्ञानेश्वर)

ज्ञानेश्वरीचे शुद्धीकरण, संवर्धन केले. त्यांचे कार्य म्हणजे केवळ ग्रंथ संरक्षण नाही; तर ती एका महान आध्यात्मिक परंपरेची मशाल पुढे नेण्याची जबाबदारी होती. म्हणूनच वारकरी संप्रदायाचा खांब असे बहिणाबाईने म्हटले आहे. एकनाथांच्या लेखणीतील भक्ती आणि लोकप्रबोधनाचा सुंदर मेळ हा ज्ञानदेवांच्या वारशाचीच पुढची पायरी वाटतो. त्यामुळे ज्ञानदेवांची वैचारिक परंपरा एकनाथांच्या माध्यमातून अधिक दृढ झाली असे म्हणता येईल. त्यांच्या मनातील ज्ञानदेवांविषयीचा आधार त्यांच्या अभंगातून जाणवतो.

'कृपाळू उदार माझा ज्ञानेश्वर ।
जया नमस्कार वारंवार।' (एकनाथ)
'ज्ञानदेव ज्ञानदेव वदता वाचे ।
नाही कळी काळाचे भेव जीवा।' (एकनाथ)

संत तुकाराम–

संत तुकारामांच्या अभंगवाणीतून ज्ञानेश्वरांविषयीचा आदर आणि आत्मीयता अनेक ठिकाणी व्यक्त होते. ज्ञानेश्वरांनी मांडलेली विश्वात्मक भक्ती, समत्वाची भावना आणि अंतःकरणातील ईश्वराचा शोध तुकारामांच्या अभंगविश्वात नव्या रूपाने उमटतो. तुकारामांच्या अभंगांमध्ये ज्ञानेश्वरांच्या तत्त्वज्ञानाचे तंतोतंत पुनरुचारण नाही; परंतु आत्मानुभव, नामभक्ती, सर्वात्मभाव आणि विठ्ठलाशी थेट संवाद ही भावभूमी वारकरी परंपरेच्या ज्ञानेश्वरांनी घातलेल्या पायाशी जोडलेली आहे. म्हणून ज्ञानदेवांचा विचार तुकोबांकडे तत्त्वज्ञान म्हणून कमी आणि जगलेल्या अनुभवाच्या अभंगरूपात अधिक दिसतो. त्यामुळेच ज्ञानेश्वरीच्या भावभूमीचे आर्त लोकगीत असेदेखील तुकारामांच्या अभंगांबाबत म्हटले जाते.

तुकारामांच्या अभंगांमध्ये ज्ञानेश्वरांच्या भावविश्वाचा प्रभाव आणखी एका रूपात जाणवतो. तुकारामांची भाषा अधिक थेट, अनुभवसंपन्न आणि कधी विद्रोही आहे. परंतु त्यांच्या भक्तीच्या केंद्रस्थानी असलेला आत्मानुभव आणि विठ्ठलाशी असलेले अद्वैतसदृश नाते ज्ञानदेवांच्या परंपरेशी जोडलेले दिसते. तुकारामांच्या अभंगातून ज्ञानदेवांचाच विचार जणू नव्या काळाच्या भाषेत बोलू लागतो. देव हा मंदिरापुरता मर्यादित नसून तो चराचरात आहे. भक्ती ही बाह्य कर्मकांडापेक्षा अंतःकरणाची अनुभूती आहे आणि माणसामाणसांत भेद नसावा. ही व्यापक दृष्टी तुकारामांच्या अभंगात अधिक प्रखरपणे जाणवते. ज्ञानदेवांच्या ओव्यांमध्ये निसर्गातील प्रत्येक वस्तू चैतन्यमय होते. तुकारामांच्या अभंगातही जीवनातील अगदी सामान्य अनुभवातून आध्यात्मिक सत्य प्रकटते. त्यामुळे ज्ञानदेवांनी उघडलेली भक्तीची वाट तुकोबांच्या अभंगातून अधिक लोकाभिमुख आणि जीवनस्पर्शी झालेली दिसते.

जनाबाईंच्या भावविश्वातील ज्ञानदेव

संत ज्ञानदेवांनी अध्यात्माचा अधिकार सामान्य माणसापर्यंत नेत जे कार्य केले त्याच लोकाभिमुख भक्तिपरंपरेत स्त्री संतांच्या अनुभवांनाही अभिव्यक्ती मिळाली. संत मुक्ताबाई ही तर त्यांची लहानगी बहीणच

होती. ती स्वयंभू असली तरी तिच्यावर ज्ञानदेवांच्या विचारांचा प्रभाव पडणे साहजिकच होते. त्याशिवाय संत जनाबाई, संत सोयराबाई, संत कान्होपात्रा, संत बहिणाबाई, भागू इ. संत स्त्रियाही ज्ञानदेवांच्या विचारांनी प्रेरित झाल्या होत्याच. त्याच्या छटा त्यांच्या अभंगातून उमटल्या आहेत.

संत जनाबाईंच्या भक्तीवरही व्यापक वारकरी वातावरणाचा प्रभाव दिसतो. जनाबाईंच्या अभंगात विठ्ठल हा मंदिरात बंदिस्त देव नसून तिच्या दैनंदिन जीवनात सहभागी होणारा सखा आहे. दळण कांडण, झाडलोट करणे, यासारख्या श्रमाच्या घरकामातही विठ्ठलाचा अनुभव घेण्याची तिची दृष्टी भक्तीला जीवनाशी जोडते.

जनाबाई तर ज्ञानदेवांसह तत्कालीन संतांची मांदियाळी उभी करते.

'विठो माझा लेकुरवाळा। संगे गोपाळांचा मेळा।
पुढे चाले ज्ञानेश्वर । मागे मुक्ताई सुंदर ।'

ज्ञानेश्वरांविषयी जनाबाई आदर व्यक्त करताना म्हणते–

'सखा विरळा ज्ञानेश्वर । नामयाचे जो जिव्हार।
ऐशा संता शरण जावे। जनी म्हणे त्याला घ्यावे।'

(जनाबाई)

इतकेच नाही तर विठ्ठलाला सामान्य पातळीवर आणून त्याला शिव्या घालण्याचंही धाडस ती करते. चोरीचा आळ आला तेव्हा–

'अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या।
तुझी रांड रंडकी झाली। जन्म सावित्री चुडा ल्याली।
तुझे गेले मढे। तुला पाहून काळ रडे।'

अशी निर्भर्त्सनादेखील ती करते. किंवा

'सिंव्हाचे भातुके जम्बूक पै नेता।
थोरांचीया माथा लाज वाटे।' (कान्होपात्रा) किंवा
'जन्म गेला उष्टे खाता ।
तरीही लाज न ये तुझिया चित्ता'। (कर्ममेळा)

केवढे हे धाडस! ही ताकत त्यांच्यात कुठून आली. तर ती ज्ञानदेवांच्या शब्दांनी ती दिली असेच म्हणावे लागेल. एकप्रकारे आश्वस्तता त्या शब्दांमध्ये होती. विठ्ठलाशी असणारं नातं, प्रेम, अधिकार सर्वच असामान्य!!! ज्ञानेश्वरांनी अध्यात्माला जीवनापासून वेगळे न करता जीवनाच्या प्रत्येक अनुभवात चैतन्य शोधण्याची नवी दृष्टी संतांना दिली. तीच संतांनी आपल्या व्यवसायाच्या आणि जगण्याचा संदर्भात व्यक्त केली. ज्ञानेश्वरांनी अध्यात्माला सामान्य माणसाच्या अनुभव विश्वात आणले. त्यामुळे प्रपंचातील प्रत्येक कृतीत परमात्म्याचा अनुभव ही संत परंपरेतील भावना या संतांच्या अभंगात अत्यंत सहज रूपात प्रकटते.

संत चोखामेळा

चोखोबांच्या अभंगांमध्ये सामाजिक विषमतेची वेदना आहे; पण त्याचबरोबर विठ्ठलावरील आढळ प्रेम, श्रद्धा आहे. देवाच्या दृष्टीने भक्ताच्या जन्माला नव्हे, तर भावाला महत्त्व आहे. ही भूमिका वारकरी संप्रदायाच्या समतावादी अधिष्ठानाशी जोडलेली आहे. ज्ञानेश्वरांच्या सर्व जिवांमध्ये एकच चैतन्य आहे या तत्त्वदृष्टीशी चोखामेळाचा भक्तीभाव अंत:सूत्राने जोडलेला दिसतो. ज्ञानेश्वरांची समता तत्त्वज्ञानातून येते; तर चोखोबांची समता जगलेल्या अनुभवातून आणि वेदनेतून व्यक्त होते. धागा मात्र एकच...! हाच धागा सोयराबाईच्या अभंगाशीही जोडलेला आहे.

चोखामेळाला सर्वच संतांविषयी आदर आहे. ते म्हणतात,

'सप्रेम निवृत्ती आणि ज्ञानदेव ।
मुक्ताईचा भाव विठ्ठल चरणी।
सोपान, सावता, गोरा तो कुंभार ।
नरहरी सोनार प्रेम भरीता।' (चोखामेळा)

नामदेवांविषयी– 'धन्य धन्य नामदेव'

संत सावता माळी

संत सावता माळी यांच्या भावविश्वात शेती आणि विठ्ठलभक्ती यांचे विलक्षण ऐक्य आहे. शेतातील काम करतानाही मन विठ्ठलमय राहते.

'कांदा मुळा भाजी । अवघी विठाबाई माझी ।'

ही भावना ज्ञानेश्वरांच्या कर्मयोगाच्या समन्वयाची नाते सांगते. अध्यात्मासाठी संसार सोडण्याची गरज नाही. आपले कर्तव्य प्रामाणिकपणे करताना ईश्वराशी जोडलेले राहता येते ही वारकरी जीवनदृष्टी पुढे सावता माळीच्या

अभंगातून सहजपणे प्रकटते. कर्मातच भक्ती हे सूत्र त्यांनी आयुष्यभर जपले.

नरहरी सोनार–

नरहरी सोनार हे शिवभक्त होते; पण विठ्ठलाच्या अनुभूतीतून त्यांच्या भक्तीला व्यापकता प्राप्त झाली, अशी संत परंपरेत कथा आहे. ज्ञानेश्वरांच्या समन्वयवादी दृष्टिकोनात शिव आणि विष्णू, सगुण आणि निर्गुण, ज्ञान आणि भक्ती यांच्यातील भेद विरघळतात. नरहरी सोनाराच्या भक्तीपरंपरेत दिसणारा हा समन्वय वारकरी अध्यात्माच्या व्यापक भूमिकेशी जोडलेला आहे. व्यवसायातून साधनेकडे ही त्यांची भूमिका सर्वश्रुत आहे.

संत बहिणाबाई

बहिणाबाईंच्या अभंगांमध्ये ज्ञानेश्वरांविषयी विशेष आदर आढळतो. त्यांच्या आध्यात्मिक जडणघडणीत ज्ञानेश्वरी आणि संत परंपरेचा प्रभाव फार महत्त्वाचा आहे. बहिणाबाईंच्या भक्तीत ज्ञान, वैराग्य, संसारातील कर्तव्य आणि विठ्ठलभक्ती यांचा समन्वय दिसतो. त्यामुळे त्या ज्ञानेश्वरांनी घालून दिलेल्या ज्ञानभक्तीच्या समन्वयवादी वाटेच्या पुढील पिढीतील महत्त्वाच्या प्रतिनिधी ठरतात. ज्ञानेश्वरीचा अंत:प्रवाह हा मोठ्या प्रमाणात संत बहिणाबाईंच्या अभंगांतून वाहताना दिसतो.

'ज्ञानदेवे रचिला पाया । तुका झालासे कळस ।'

संत निळोबाराय

निळोबारायांच्या परंपरेत ज्ञानेश्वरांविषयीची भक्तीभावना विशेष उल्लेखनीय आहे. त्यांच्या संतपरंपरेत ज्ञानदेव हे केवळ पूर्वसूरी नसून आध्यात्मिक मार्गदर्शक आणि पूज्य संत म्हणून उभे राहतात. ज्ञानेश्वर भक्तीचा थेट धागा त्यांनी पकडला आहे.

ज्ञानदेवांच्या विचारातील सर्व जीवातील एकत्वाची भावना पुढील सर्व संतांच्या समत्ववादी भूमिकेत प्रतिबिंबित झालेली दिसते. चोखामेळा, जनाबाई, गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार, बहिणाबाई, निळोबा यासारख्या संतांच्या भक्ती परंपरेत जातीभेदापेक्षा भक्ती आणि माणुसकी श्रेष्ठ मानण्याची भूमिका दिसते. या संतांच्या भक्ती परंपरेत ज्ञानेश्वरांनी सांगितलेल्या लोकाभिमुख अध्यात्माचीच छाया प्रकटपणे जाणवते. भक्तीचा अधिकार सर्वांना आहे. माणसाचे मोठेपण त्याच्या जन्मात नसून त्याच्या अंत:करणातील भावनेत आहे ही समतेची जाणीव ज्ञानेश्वरांनी वारकरी परंपरेत दृढ केली.

ज्ञानदेवांच्या प्रभावाचा व्यापक पट पाहिला तर असं लक्षात येतं की, ज्ञानदेवांनी विचारांची बीजे पेरली. नामदेवांच्या भक्तीत ती सख्याने फुलली. जनाबाईच्या श्रमात ती उमलली. चोखोबांच्या वेदनेत समतेची झाली. सावत्याच्या शेतात कर्मभक्ती बनली. बहिणाबाईंच्या अंतर्मनात ज्ञानभक्त झाली आणि पुढे महाराष्ट्राच्या संत परंपरेने विशाल वटवृक्ष रूप धारण केले. आषाढी, कार्तिकी एकादशीला पंढरपूरला भरलेल्या यात्रेच्या निमित्ताने हे रूप आपल्याला 'याची देही याची डोळा' बघता येते.

पंढरीच्या वारीचा माझा अनुभव... यंदाची वारी शब्दातीत

ग्लोबल वारी– लंडनहून निघाली –११ देश सामील आंतरराष्ट्रीय स्वरूप आले... लोकप्रियता...

ज्ञानेश्वरांची ही प्रभावळ म्हणजे केवळ त्यांच्यानंतर आलेल्या संतांवर झालेला प्रभाव नव्हे. ती म्हणजे एका संताने निर्माण केलेल्या आध्यात्मिक भावभूतीचा अनेक संतांनी केलेला सर्जनशील विस्तार आहे.

- ज्ञानदेवांनी या इमारतीचा पाया रचला.
- नामदेवांनी सीमेपार भक्तीचा विस्तार केला.
- जनाबाईने तिला घराच्या उंबरठ्यावर आणले.
- चोखोबांनी तिला समतेची वेदना दिली.
- सावत्याने कर्माशी जोडले.
- गोरा आणि नरहरींनी श्रमात अनुभवले.
- एकनाथांनी ज्ञानेश्वरीचा दीप पुन्हा प्रज्वलित केला.
- तुकारामांनी त्याला आर्त नामाचा कळस चढवला. आणि
- बहिणाबाईंनी संपूर्ण संत परंपरेचे एक अद्‌भुत मंदिर उभे केले.

हीच खरी ज्ञानेश्वरांची प्रभावळ... व्यक्तीची नव्हे तर एका चिरंतन आध्यात्मिक सांस्कृतीची.